cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१०४ | रविवार दि.०४ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सरकारी उदासिणता आणि बेफिकीरी घातक ठरतेय

भूस्खलन, दरडसंकट वा ढगफुटी देशासाठी आता घातक ठरत आहे. मागच्या काही वर्षात सातत्याने या संकटाला राष्ट्राला सामोरे जावे लागले आहे. २०१४ मध्ये पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण या गावात वायनाडसारखीच आपत्ती घडली होती. त्याला अलीकडेच १० वर्षे पूर्ण झाली. किंबहुना वायनाड व माळीणच्या दुर्घटनेत बरीच साम्ये दिसते. माळीणमध्येही अगदी पहाटेच्या सुमारास सह्याद्रीच्या रांगेतील डोंगरकडा कोसळला व त्यात माळीण हे गाव अक्षरश: गडप झाल्याचे दिसून आले.

### योगींच्या सूचनेनंतर अलिगडमध्ये ९४ मदरसे बंद होणार!

लखनौ : उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांचे तडखाफडखीचे निर्णय आणि बुलडोझर कारवाई याची चर्चा देशभरामध्ये चालू असते. उत्तर प्रदेशात सुरू असलेले मदरसे पुन्हा एकदा मुख्यमंत्री योगींच्या रडारवर आले आहेत. नोंदणी नसलेल्या मदरशांची यादी अधिकाऱ्यांना बनवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यादी बनवण्यास अधिकाऱ्यांनी सुरुवात केली असून अलीगडमधील मदरशांवर कारवाई करण्यात आलेली आहे. अलिगड जिल्ह्यातील जिल्हा अल्पसंख्याक कल्याण अधिकाऱ्यांच्या अहवालात ९४ मदरसे बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे आढळून आले आहेत.

# अवकाळीच्या नुकसान भरपाईसाठी ५९६ कोटी वाटपास मंजुरी

## जानेवारी ते मे २०२४ दरम्यान नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळणार मदत

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात जानेवारी ते मे २०२४ या कालावधीत विविध जिल्ह्यात अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना ५९६ कोटी २१ लाख रुपये नाशिक, पुणे, अमरावती, नागपूर या विभागातील जिल्ह्यांना वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी दिली.**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे, याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे. अवेळी पाऊस, गारपीट व इतर



नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्यात येते. त्या अंतर्गत या निधी वाटपास शासनाने मंजुरी दिली. मंत्री अनिल पाटील म्हणाले की, जानेवारी ते मे, २०२४ या महिन्यात अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्तांकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. नाशिक विभागातील अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यांत शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानी करता १०८२१.०० लाख रुपये, पुणे विभागातील सोलापूर व पुणे जिल्ह्यातील नुकसानीसाठी ५८३.९९ लाख रुपये, अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम या जिल्ह्यातील नुकसानासाठी ३८२१२.४१ लाख रुपये, नागपूर विभागातील चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर या जिल्ह्यातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी १०००४.३५ लाख रुपये असे एकूण एकूण रु.५९६.२१९५ कोटी (पाचशे शहाण्णव ◀◀ पान २ वर

## शरद पवार-एकनाथ शिंदे यांची दुसऱ्यांदा भेट; चर्चांना उधाण



**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शनिवारी (दि.३) वर्षा निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये मराठा आरक्षणाबाबत चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. दोन आठवड्यांतील शरद पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यातील ही दुसरी भेट आहे. याआधी मनसे ◀◀ पान २ वर

# मी ढेकणाला आव्हान देत नाही!

## उद्धव ठाकरेंची फडणवीसांवर नाव न घेता टीका, अमित शाहांची तुलना अहमद शाह अब्दालीशी

**पुणे । प्रतिनिधी**

**उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता ढेकूण असा उल्लेख केला आहे. उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह आणि भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही निशाणा साधला. पुण्यातील शिवसंकल्प मेळाव्यात ते**



**बोलत होते.**

माझ्या नादाला लागू नका, या देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेवर बोलताना उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, मी कोणत्या ढेकणाला आव्हान देत नाही. ढेकणं ही अंगठ्याने चिरडायची असतात. एकतर मी राहीन किंवा तू राहशील असे मी म्हटले तर कुणाला तरी वाटल मला बोलले. मग ते बोलले माझ्या नादाला लागू नका. पण ते नादाला लागण्याच्या कुवतीचे नाहीत, असे ठाकरे म्हणाले. केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी पुण्यात येऊन उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र सोडले होते. उद्धव ठाकरे औरंगजेब फॅन क्लबचे प्रमुख असा उल्लेख अमित शाह यांनी केला होता. याला प्रत्युत्तर म्हणून उद्धव ठाकरे यांनी अमित शाहांची तुलना अहमद शाह ◀◀ पान २ वर

### *गळती लागलेले सरकार...*

*भाजप सरकारच्या विकासाच्या मॉडेलवर टीका करताना उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, भाजप नेते काँग्रेसवर टीका करतात की तुम्ही ७० वर्षात काय केले? काँग्रेसने काय केले यापेक्षा तुम्ही काय केले हे सांगा. मोदी सरकारने बांधलेले संसद भवन वर्षभराच्या आत गळायला लागले. राम मंदिर गळतेय, संसद गळतेय, हे गळती लागलेले सरकार आहे. याला गळती सरकार म्हणायचे की नाही? अशी विचारणा उद्धव ठाकरेंनी केली.*



## मनू भाकरचा ट्रिपल धमाका हुकला

पॅरिसः भारताची स्टार नेमबाज मून भाकरने ऑलिम्पिकमध्ये दमदार कामगिरी केली आहे. तिने तिसऱ्यांदा पदक मिळवण्याचा पूर्ण ताकदीने प्रयत्न केला. पण यात तिला यश आले नाही. मून भाकर २५ मीटर प्रकारात आणखी एक पदक घेऊन येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. पण तिला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. भारताच्या २२ वर्षीय मनू भाकरने ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली. तिने पुन्हा एकदा अंतिम फेरी खेळली. याआधी तिने दोन कांस्य पदकांना गवसणी घातली होती. ◀◀ पान २ वर

## बीडच्या तहसीलदारपदी चंद्रकांत शेळके

बीड । प्रतिनिधी

शासनाने तहसीलदार संवर्गातील अधिकार्यांच्या आज दि.३ ऑगस्ट रोजी पदस्थापनेने बदल्या केल्या आहेत. बीडच्या तहसीलदारपदी अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीडचे तहसिलदार म्हणून नरेंद्र कुलकर्णी काम पाहत होते. दरम्यान, आज बीडच्या तहसीलदार पदी चंद्रकांत शेळके यांना नियुक्ती देण्यात आली असून शेळके यांनाप्रशासकीय कामकाजाचा मोठा अनुभव असल्याने बीड तहसीलच्या कामकाजाला गती मिळणार आहे.

# नाशिकच्या जागेवरुन महाविकास आघाडीत मिठाचा खडा!

## काँग्रेस आणि शरद पवार गट उबाठावर नाराज

**नाशिक । वृत्तसंस्था**

**लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाने सांगलीच्या जागेवर परस्पर उमेदवार जाहीर केल्याने महाविकास आघाडीत चांगलीच कटुता निर्माण झाली होती. आता विधानसभेतही ठाकरे गट पुन्हा तीच चूक करत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला आहे. नाशिकच्या दिंडोरी जागेवर ठाकरे गटाने काँग्रेस आणि शरद पवार गटासोबत चर्चा न करता आपला उमेदवार जाहीर केला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांनी ठाकरेंच्या विरोधी भूमिका घेतल्याचे चित्र आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाची महत्वाची बैठक काही दिवसांपूर्वी पार पडली. या बैठकीत नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर हे निवडणूक लढवीतील असा निर्णय घेण्यात आला. तर नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघाची ◀◀ पान २ वर

## नाथऱ्यात गोळीबार; आरोपी फरार!

**परळी । प्रतिनिधी**

पालकमंत्री तथा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नाथरा या गावी आर्थिक व्यवहारातून गोळीबार झाल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. नाथरा येथील महादेव मुंडे आणि प्रकाश मुंडे यांच्यात आर्थिक व्यवहारातून गेल्या अनेक दिवसापासून वाद सुरु होते. शनिवारी दुपारच्या सुमारास प्रकाश मुंडे यांनी गावठी पिस्तूल मधून हवेत गोळीबार केल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पोलीस निरीक्षक मनिष पाटील पुढील तपास करत आहेत.

# *आधी आरोप नंतर पक्षात प्रवेश ही भाजपाची स्टाइल*

## सुप्रिया सुळे यांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

**माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपामधील एकही आरोप सिद्ध झालेला नाही. मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर हे पत्र आरोप प्रत्यारोप कसे काय येते असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी विचारला.**



सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, या पत्राची वेळ बघा, विधासभेच्या निवडणुका दोन महिन्यावर आल्या आहेत. इतके वर्षे गल्लीपासून दिल्लीपर्यंत यांची सत्ता आहे. गेली दहा वर्षे यांची सत्ता आहे. या गोष्टी आताच कशा काय येतात? गेली अडीच वर्षे त्यांचे सरकार महाराष्ट्रात आहे. बरोबर विधानसभेआधीच हे पत्र, आरोप-प्रत्यारोप कसे काय येतात? अशी प्रश्नांची सरबती त्यांनी भाजपावर केली. पुढे बोलताना सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, अनिल देशमुख यांच्या विरोधात जे आरोप करण्यात आले, यातील एकही आरोप सिद्ध झालेला नाही. ते सगळे खोट ठरलेले आहेत. १०० कोटी आरोपाचे काही झालेले नाही. त्यामुळे आता दुसऱ्या कोणाचे यात नाव येणे म्हणजे मला आता हे सगळे बालिशपणाचे वाटत आहे अशी टीकाही यावेळी केली. सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्राचे राजकारण गलिच्छ झाले आहे, बालिशपणाचे आरोप केले जात आहेत. आमचा पक्ष सुसंस्कृत आहे. गलिच्छ गोष्टी आम्ही कधी केल्या नाहीत. भाजपाची स्टाइल आहे की आधी आरोप करायचे नंतर त्यांनाच आपल्या पक्षात घ्यायचे. पत्र कोणी लिहिलेय? कधी लिहिलेय? मीही पत्र लिहून आरोप करेन, असे नसते आयुष्य खूप सिरिअस आहे. आम्ही कधीही खोटे आरोप करत नाही. आम्ही बदल करण्यासाठी राजकारणात आल्याचेही त्या म्हणाल्या.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संजय राऊत, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ या सर्व ◀◀ पान २ वर

# फास्टॅगमध्ये मोठा बदल, जुने बदलावे लागणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**फास्टॅगच्या वापरासंबधित नियमांत महत्त्वाचे बदल झालेले आहेत. या नियमांनुसार दर पाच वर्षांनी वाहनधारकांना फास्टॅग बदलावे लागणार आहेत. तसेच दर तीन वर्षांनी केवायसी अपडेट करावी लागणार आहे. फास्टॅग पुरवणाऱ्या संस्था ही प्रक्रिया वाहनधारकांना सुटसुटीत राहील, अशा पद्धतीने अंमलात आणणार आहेत.**




नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू :१.५० क्विंटल | | |
| २,५०१ | २,५११ | २,५०६ |
| ज्वारी/हायब्रिड :३१.०० क्विंटल | | |
| २,१५७ | २,६६२ | २,३६१ |
| मूग :१४.५० क्विंटल | | |
| १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | | |
| ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: १२.०० क्विंटल | | |
| २,४६१ | ३,४०० | २,७५२ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | | |
| ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | | |
| ४,५०० | ६,५९९ | ५,६५१ |

# रस्ते अपघातातील जखमींवर आता मोफत उपचार!

## राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण आणि रस्ते वाहतूक मंत्रालयाचा मोठा निर्णय

### दिड लाखांपर्यंतचा खर्च सरकार उचलणार, चंदीगड, आसाममध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरूवात

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

रस्ते अपघातातील जखमींवर आता कॅशलेस पद्धतीने उपचार होणार आहेत. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत दिड लाखापर्यंत हे उपाचर केले जाणार आहेत. ही योजना सध्या प्रायोगिक तत्त्वावर चंदीगड आणि आसाममध्ये सुरू करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, रस्ते वाहतूक मंत्रालय यांच्यावतीने ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या योजनेची माहिती दिली आहे. वाहनामुळे झालेला अपघात, तसेच तो कोणत्याही रस्त्यावर झाला असेल तरीही हे उपचार मिळणार आहेत. या योजनेत लाभार्थींना ट्रॉमा आणि पॉलिट्रॉमा संबंधित उपचार नोंदणीकृत हॉस्पिटलमध्ये केले जातील. जास्तीजास्त दिड लाखापर्यंतचा खर्च यात अंतर्भूत आहे. अपघात झाल्यानंतर सात दिवसांत झालेल्या उपचारांचा खर्च यात केला जाईल, असे सांगण्यात आले आहे.

### *संबंधीत विभागाच्या समन्वयातून अंमलबजावणी*

*मंत्रालयाने मोटार वाहन अपघात निधी गठित केलेला आहे, त्यातून हा उपचाराचा खर्च केला जाणार आहे. ही योजना राबवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, रस्ते वाहतूक मंत्रालय, स्थानिक पोलिस, नोंदणीकृत हॉस्पिटल, राज्य सरकारची आरोग्य यंत्रणा, जनरल इन्शुरन्स काऊन्सिल यांच्या समन्वयातून या योजनेची अंमलबजावणी केली जाईल.*



cmyk

## अग्रलेख

# सरकारी उदासिणता आणि बेफिकीरी घातक ठरतेय

भूस्खलन, दरडसंकट वा ढगफुटी देशासाठी आता घातक ठरत आहे. मागच्या काही वर्षांत सातत्याने या संकटाला राष्ट्राला सामोरे जावे लागले आहे. २०१४ मध्ये पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण या गावात वायनाडसारखीच आपत्ती घडली होती. त्याला अलीकडेच १० वर्षे पूर्ण झाली. किंबहुना वायनाड व माळीणच्या दुर्घटनेत बरीच साम्ये दिसते. माळीणमध्येही अगदी पहाटेच्या सुमारास सह्याद्रीच्या रांगेतील डोंगरकडा कोसळला व त्यात माळीण हे गाव अक्षरश: गडप झाल्याचे दिसून आले. पहाटेच्या समयी ही दुर्घटना घडल्याने त्यात तब्बल १७१ जणांना आपला जीव गमवावा लागला. त्याचीच पुनरावृत्ती केरळातही पहायला मिळाली.

दुर्घटनेआधी माळीणमध्ये दोन ते चार दिवसांपासून सतत पाऊस सुरू होता. भुबरा नदीच्या कुशीत वसलेल्या या भागात अतिवृष्टी झाली व त्यानंतर डोंगराचा एक भाग कोसळून हे संकट कोसळल्याचे सांगण्यात येते. तथापि, डोंगरावर पडकाई योजनेतून शेततळ्यास व शेतीस परवानगी दिल्याने डोंगर खचल्याचा आरोपही करण्यात आला होता. अगदी स्वातंत्र्यापासूनचा आढावा घेतला, तर या सात ते साडेसात दशकात भूस्खलनाच्या असंख्य दुर्घटनांची नोंद झाली आहे. मात्र, प्रमुख घटनांचा गोषवारा घेतला, तर १९४८ पासून सुरूवात करावी लागते. आसाममधील गुवाहाटीतील भूस्खलनात तब्बल ५०० नागरिकांचा मृत्यू झाला होता. तर १९६८ मध्ये दार्जिलिंग, सिक्कीममध्ये राष्ट्रीय महामार्ग ठिकठिकाणी खचून जवळपास हजारभर नागरिक मृत्यूमुखी पडल्याची नोंद आहे. १९९८ मध्ये यूपीतील मालपा गाव जमीनदोस्त होऊन साडेतीनशे जणांना जीव गमवावा लागला होता. २०१३ या सालातील प्रसिद्ध केदारनाथमधील भूस्खलनही अत्यंत विनाशकारी मानले जाते. ढगफुटीमुळे या भागात अक्षरश: हाहाकार उडाला होता. जलप्रलय व भूस्खलनाने साडेपाच ते सहा हजार लोक तेव्हा मृत्युमुखी पडले, तर गावेच्या गावे वाहून गेली. अजूनही या भागातील आपत्तींचे सत्र थांबलेले नाही. केरळबद्दल बोलायचे झाले, तर अलीकडे तिथेही वारंवार अशा घटना घडत असल्याचे पहायला मिळते. २०१८ मध्ये इडुक्कीत १४३ ठिकाणी भूस्खलन झाले व त्यात १०४ जणांचा बळी गेला. तर २०१९ मध्ये केरळातील आठ जिल्ह्यांमध्ये तीन दिवसांत तब्बल ८० भूस्खलनाच्या दुर्घटनांची नोंद झाली व त्यातही जवळपास १२० जणांचा मृत्यू झाला होता. केरळमधील डोंगरभागाचा समतोल ढासळत असल्याचेच हे द्योतक म्हणायला हवे.

वास्तविक पश्चिम घाट हा संवेदनशील मानला जातो. पश्चिम घाटाचे संवर्धन व जतन करण्यासाठी सरकारने गाडगीळ समितीची स्थापना केली होती. गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळपर्यंत पश्चिम घाट पसरलेला असून, त्याचे पर्यावरणीय महत्त्व या समितीने अधोरेखित केले. याशिवाय या परिसरात बांधकाम, मोठे रस्ते, प्रकल्प, धरणे, रेल्वे, हिल स्टेशन, कीटकनाशके, सुधारित पीक वापरास मनाई केली. प्रत्यक्षात या ना त्या माध्यमातून पश्चिम घाटावर अतिक्रमण होत राहिले. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात डोंगरफोड, वृक्षतोड हा तर येथील परिपाठच आहे. त्यातून डोंगरसाखळीला धक्का बसत असून, दरडी कोसळण्यास वा भूस्खलना हाच घटक प्रामुख्याने कारणीभूत होत असल्याचे दिसते. सह्याद्रीच नव्हे, तर अगदी हिमालयापासून देशातील सर्वच पर्वतीय प्रदेशांमध्ये बिनभोबाट हे उद्योग सुरू आहेत. तथापि, त्याकडे सरकारचे लक्ष नाही. केरळबाबत आम्ही अतिवृष्टीचा इशारा दिला होता, असे केंद्र सरकारने म्हटले आहे. केंद्राने इशारा देणे व त्यानंतर राज्याने उपाययोजना करणे अपेक्षितच होय. मात्र, नैसर्गिक संकटांना फक्त अशा मर्यादित चष्म्यातून पाहून चालणार नाही. निसर्गावरील जी आक्रमणे सुरू आहेत, ती सर्वप्रथम रोखायला हवीत. त्याचबरोबर धोकादायक ठिकाणांची निश्चिती करून या भागातील लोकांचे पुनर्वसन करणे क्रमप्राप्त ठरते. जीएमआयकडून डोंगरभागातील जोखमीच्या ठिकाणांचे सर्व्हेक्षण होत असते. धोकादायक गावांची यादीही तयार होते. मात्र, पुनर्वसनाचे भिजत घोंगडे कायम राहते. हे दुष्टचक्र एकदाचे संपले पाहिजे. एखाद्या गावाचे पुनर्वसन होण्यासाठी त्या गावावर डोंगर कोसळण्याची वाट यापुढे तरी सरकारने पाहू नये. हवामान या विषयावर अलीकडच्या काही वर्षांत जगभर चर्चा सुरू आहे. हवामानातील बदल, जागतिक तापमानवाढ हे आज मानव जातीपुढचे सर्वांत मोठे संकट आहे. मात्र, या संकटाचेही मूळ पर्यावरणाच्या ऱ्हासातच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. ढगफुटी, उष्णता वा थंडीच्या लाटा, दुष्काळ यांसारखी संकटे पुढच्या टप्प्यात वाढू शकतात, अशी भीती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आगामी काळात डोंगरावरील निसर्गसंपदा व जैवविविधता जपण्याबरोबरच एकूणच पर्यावरणाबाबत जागरूक राहायला हवे. सावध ऐका पुढल्या हाका असे म्हणण्याची वेळ आली आहे.

## केज उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा

**केज । प्रतिनिधी**

केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. गुरुवार रोजी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. स्तनदा मातांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केंद्रे यांनी स्तनपान या विषयावर मार्गदर्शन केले. आहार तज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आई व बाळासाठी स्तनपानाचे महत्त्व सांगितले.



स्तनदा मातेच्या आहाराविषयी मार्गदर्शन केले. समुपदेशक सीता गिरी यांनी स्तनपानाच्या वेगवेगळ्या पद्धती विषयी मार्गदर्शन केले व श्रीमती जगताप यांनी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले. चित्रफित,चार्टच्या माध्यमातून मातांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास स्तनदा मातांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अल्टो व ट्रकच्या अपघातात एक ठार

घनसावंगी । प्रतिनिधी

अल्टो कार व ट्रकच्या धडकेत एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना अंबड घनसावंगी रोडवर बोलेगाव फाट्यानजीक घडली. रामसगाव ता. घनसावंगी येथील रहिवासी अनिल शेषराव भालेकर व प्रकाश भालेकर हे दोघे काल दि.२ ऑगस्ट च्या रात्री अंबड येथुन तीर्थपुरी कडे येत होते. यावेळी वाहनाचा अंदाज न आल्याने बोलेगाव फाट्यानजीक उभ्या असलेल्या ट्रकवर (क्रमांक एम एच ५ के ९०४३) भालेकर यांची अल्टो कार (क्रं एम एच २१ सी २५७५) आदळली.या भीषण अपघातामध्ये कारचा चक्काचूर झाला असून कार मध्ये असलेले अनिल शेषराव भालेकर हे जागीच ठार झाले तर गाडी चालवत असलेले प्रकाश भालेकर हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना जालना येथील रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलवले आहेत. अनिल शेषराव भालेकर हे मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात मुलगा,मुलगी, आई, पत्नी, दोन भाऊ असा मोठा परिवार आहे ३ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या गावी रामसगाव येथे दुपारी बारा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार राजेश टोपे यांच्यासह नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## वंचितचे अॅड.प्रकाश आंबेडकर यांची जालन्यात ६ ऑगस्टला सभा–अरूण गिरी

**जालना। प्रतिनिधी**

**वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांची जालना येथे जाहिर सभा होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष अरूण गिरी यांनी दिली.**

३ जुलै शनिवार रोजी जालना येथील हॉटेल मधुबन येथे सायंकाळी सहा वा.च्या सुमारास वंचित बहुजन आघाडीचे स्वागत समितीचे कार्याध्यक्ष अरुण गिरी यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद घेण्यात आली आहे, ओबीसी समाज हा जनजागृती करण्यासाठी समाजाला जागृत करण्यासाठी अॅड.प्रकाश आंबेडकर हे स्वतःहून प्रत्येक जिल्ह्यामध्ये सभा घेतायेत, रॅली काढतात त्याच उद्देशाने येणार्या ६ तारखेला अॅड.प्रकाश आंबेडकर हे जालना येथे येत आहे, ओबीसी समाजाला न्याय देण्यासाठी या ठिकाणी त्यांची सभा आयोजित करण्यात आली आहे संध्याकाळी साडेसहा ते सात वाजता मंठा चौफुली येथे त्यांचे स्वागत होईल व रॅली काढून गांधी चमन येथे त्यांची सभा होणार आहे, ओबीसी समाज बांधवांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी स्वागत समिती अध्यक्ष राजेंद्र वांजुळे, कार्याध्यक्ष अरुण गिरी, उपाध्यक्ष दत्तू कुरधने, वंचीत बहुजन आघाडी जालना तालुका अध्यक्ष भानुदास साळवे, तालुका महासचिव वैभव वानखेडे, तालुका उपाध्यक्ष वीलास नरवडे, सचिव गौतम वाघमारे, शहर उपाध्यक्ष मनोज शर्मा, दगडू जाधव, मुकेश निकाळजे, प्रवीण खंदारे, आकाश म्हस्के, गुड्डू गिरी कृष्णा गायकवाड, मयूर निकम लखन चित्तेकर सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक घोषित

**बीड । प्रतिनिधी**

**प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक या महिन्यात घेण्यात येणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अॅड. अजित एम. देशमुख यांनी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून या कार्यक्रमानुसार दि. १३ ऑगस्ट रोजी मतदान घेण्यात येणार आहे. आणि त्याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.**

मतदार यादी घोषित करण्यात आली असून मतदार यादीवर आक्षेप असेल तर तो आक्षेप घेण्याची दिनांक पाच ऑगस्ट रोजी सोमवारी संधी देण्यात येणार आहे. या आक्षेपांची सुनावणी घेऊन सहा ऑगस्ट रोजी आक्षेपांवर निर्णय जाहीर करण्यात येईल. दि. सात ऑगस्ट रोजी उमेदवारी अर्ज वाटप केले जाणार असून त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत हे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. आणि उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार आहे. तर दिनांक ८ ऑगस्ट रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख जाहीर केली असून या दिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. यानंतर १३ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदान घेतले जाईल आणि त्याच दिवशी चार नंतर मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येईल. यावर्षी वकील संघाचे सातशे अंशी सभासद झाले आहेत.

## नाथ प्रतिष्ठानकडून श्रावण मासात वैद्यनाथ मंदिरावर विद्युत रोषणाई, दर सोमारी फुलांची सजावर

**परळी वै। प्रतिनिधी**

**येत्या सोमवारपासून पवित्र श्रावण महिन्यात सुरुवात होत असून बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथांच्या मंदिराची राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने, ना.धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्युत रोषणाईने आकर्षक सजावट करण्यात येत आहे. ठीक विद्युत रोषणाई संपूर्ण श्रावण महिना सुरू राहणार आहे.**

त्याचबरोबर प्रत्येक श्रावण सोमवारी वैद्यनाथ मंदिराच्या गाभाऱ्यासह संपूर्ण मंदिरामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे २१ प्रकारचे फुले वापरून खास फुलांची आरास व सजावट देखील करण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण महिनाभर मंदिरात च्या परिसरामध्ये ''ओम नमः शिवाय'' या मंत्राचा निरंतर जाप करणारी ध्वनी प्रणाली देखील बसवण्यात येत आहे.





प्रत्येक श्रावणी सोमवारी साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचे लाडू असा प्रसादही भाविकांना नाथ प्रतिष्ठानच्या वतीने वाटप करण्यात येणार असून येणाऱ्या सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन मामा कुलकर्णी यांनी केले आहे. मागील अनेक वर्षांपासून प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यामध्ये तसेच शिवरात्रीच्या महोत्सवामध्ये धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून प्रभु वैद्यनाथांची अशाप्रकारे विशिष्ट सेवा केली जाते तसेच भाविकांसाठी वेगवेगळ्या सुविधाही उपलब्ध करून दिल्या जातात.

# आष्टीसाठी थोरले पवार देणार सर्वांनाच चकवा

## • पाटोद्याचे वकिलच ठरणार उमेदवार पक्का

**बीड । प्रतिनिधी**

**बीड(प्रतिनिधी) महाराष्ट्राच्या राजकारणातील जाणते राजे अर्थात शरदचंद्र पवार हे पुन्हा एकदा नव्याने महाराष्ट्राची 'घडी' आपल्या ताब्यात घेण्यासाठी सरसावले आहेत. जनमाणसाची नाडी ओळखणारे पवारांसारखे दुसरे मातब्बर नेतृत्व राज्यात सोडा देशात सुध्दा नाही.बीड जिल्ह्याने कायम शरद पवार यांना साथ दिलेली आहे. परिवर्तनाच्या बाजूने दिलेला कौल हा महाराष्ट्राने स्विकारलेला आहे. तीन महिन्याने होवू घातलेल्या विधानसभेच्या निवडणूकीसाठी शरदपवार हे नव्यांना व जनसामान्यांचे प्रश्न घेवून चळवळीत काम करणार्यांना संधी देतील अशीच शक्यता दिसत आहे. आष्टी मतदार संघासाठी पवारांनी नवनवीन प्रयोग केले होते आणि ते यशस्वी सुध्दा झाल्याचा इतिहास आहे. येणार्या विधानसभेसाठी सुध्दा पवार साहेब पुन्हा एकदा जनतेच्या प्रश्नासाठी झटणार्यालाच संधी देतील असे दिसते.प्रत्येकवेळी आष्टी किंवा कडा या दोन भागांना संधी का? पाटोदा सुध्दा याच मतदारसंघाचा भाग असल्याने आणि जे प्रश्न लोकप्रतिनिधी मांडू शकत नाहीत अशा प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम अॅड.नरसिंह जाधव यांनी केले असल्यामुळे आणि त्यांनी जनहितार्थ केलेल्या कार्याचा गौरव हा विधानसभेची उमेदवारी देवूनच होऊ शकतो अशी जनभावना आहे.**

अॅड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव हे सध्या शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कॉंग्रेस पार्टी विधी सेल मराठवाडा प्रमुख आहेत,खा.शरद पवार यांच्या विचारसरणीला तळागाळात पोहचवण्याचे काम अविरत त्यांनी केल्याचे दिसते. प्रत्येक निवडणूकीत शरद पवार हा आपल्या पक्षाचा चेहरा हे मानून त्यांनी उमेदवार न बघता पक्षाच्या विजयासाठी खारीचा का होईना वाटा उचललेला आहे. अॅड.जाधव यांचे वडिल कै. अॅड.लक्ष्मणराव साहेबराव जाधव यांनी १९७८ पासून शरद पवार साहेबांसोबत काम केलेले आहे. पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा उपाध्यक्षपदही त्यांनी भुषवलेले होते. तसेच पंचायत समितीचे उपसभापती व सभापती म्हणून त्यांची कारकिर्द उल्लेखनिय ठरली होती. तसेच जिल्हा नियोजन मंडळावर त्यांनी काम केले. अॅड.नरसिंह जाधव यांचे बंधु शिवभुषण जाधव हे सध्या पाटोदा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष आहेत. अॅड.जाधव यांनी वडिलांच्या नावाने म्हणजेच कै.अॅड.लक्ष्मणराव जाधव सेवाभावी संस्थेद्वारे तालूक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहन देण्याचे कार्य केले आहे. सामाजिक प्रश्नाबाबत म्हटल्यास अॅड.जाधव यांनी औरंगाबाद येथील सुखणा व खाम नदीमधील वीट भट्या काढुन टाकुन प्रदुषण दुर करण्यासाठी तसेच नद्या मधील औद्योगिक वसाहतीमधील दुषीत पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी जनहितार्थ याचिका दाखल केल्या, नारेगंव, औरंगाबाद येथील कचरापट्टीमुळे होणारे प्रदुषण व धुरामुळे होणारा त्रास दुर करण्यासाठी जनहितार्थ याचिका दाखल केली. बीड जिल्हयातील अपात्र स्वातंत्र सैनिकांची केसमध्येसर्वोच्च न्यायालयापर्यंत वकिल म्हणुन काम पाहिले. न्यायमुर्ती पालकरआयोग वकिल म्हणुन काम केले. महितीचा अधिकार, जनहितार्थ याचिका, मूलभूत अधिकार यावर विविधि ठिकाणी शिबिरे घेऊन लोकजनजागृती केलेली आहे. तसेच पाटोदा पूलकम बंधारा,बोगस तांत्रिक मान्यता विरोधात जनहितार्थ याचिका, पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग (पालखी मार्ग) ची जनहितार्थ याचिका आदि प्रश्न न्यायालयाच्या समोर आणून दिलेले आहेत.अॅड.जाधव यांनी बीड जिल्हा परिषदेच्या स्टॅंडिंग कॉन्सिल म्हणुन दहा वर्षे काम पाहिले.तर काही प्रकरणात महाराष्ट्र शासनाचे विशेष वकिल म्हणुन काम पाहिले आहे. तसेच बीड जिल्हा परिषद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा पक्षादेश।व्हिप न पाळता जिल्हा परिषद अध्यक्षाच्या निवडणुकीत दुसऱ्या पक्षास मतदानकरणार्या जिल्हा परिषद सदस्यांना अपात्र करण्यासाठी बजरंग सोनवणे यांचे वकिल म्हणुन काम पाहिले. बीड लोकसभा निवडणूक २०२४ बजरंग सोनवणे यांना निवडुन आणण्यासाठी सक्रिय सहभाग व सभांमध्ये भाषणे केली. पाटोदा तालुका जनआंदोलन कृतीमार्फत आष्टी मतदार संघात विविधि सामाजिक कार्यात सहभाग. सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्या बीड जिल्हयातील मंदिर,मज्जित जमीनघोटाळा संदर्भात आरोपीवर गुन्हा नोंदवण्यासाठी मा. उच्च न्यायालयात याचिका चालवल्या पाटोदा नगरपंचायत झालेला भ्रष्टाचार प्रकरणे मा. उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका चालवल्या. मराठवाड्यातील ७८ तालुक्यांतील वकील संघामध्ये मित्रपरिवार व विधिसेल मार्फत काम. लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना पाटोदा तालुक्यातून १७०० मतांची लिड दिली. १९९६ ते २०२४ पर्यंत जवळजवळ आठ हजार केसेस मध्ये वकिल म्हणुन काम पाहिले. त्यामध्ये दिवाणी, फौजदारी, जनहितार्थ,



सर्व्हिस प्रकरणे, निवडणुक प्रकरणे, चालविली. विविध न्यायिक विषयावर ५० पर्यंत न्यायनिवाडे रिपोर्टेड निकाल. तसेच १९९८ साली वकील संघ उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद मध्ये सदस्य. २००४ साली सहसचिव उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, २००५-२००६ साली सचिव उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, २०१० व २०१८ साली बार कॉन्सिल महाराष्ट्र आणि गोवा निवडणुक लढविली. २०२३-२०२४ उचच न्यायालय मुंबई., खंडपीठ औरंगाबाद वकील संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत अॅड.नरसिंह जाधव यांच्या या सर्व गोष्टी पाहता व पक्षासाठी केलेले काम पाहता आष्टी मतदार संघाला एक नव्या उमेदीचा कायदेतज्ञ सुशिक्षित उमेदवार मिळाला तर नक्कीच आष्टी पाटोदा सारखा मतदार संघात चेहरा मोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही असे जनमत आहे तसेच मतदारसंघातील जनतेचे पाठबळही त्यांच्या मागे सध्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.


### कार्यालय घनसावंगी नगरपंचायत जि.जालना
### प्रशासकीय इमारत, घनसावंगी

E-mail-npghansawangi@gmail.com

जा.क्र. घनपं/जाहीर प्रगटन/ ७६७ दि.३१/०७/२०२४

**अल्प मुदतीची जाहीर निविदा सुचना**
**(प्रथम प्रसारण)**

घनसावंगी नगर पंचायत हद्दीतील खालील नमूद कामे करणेसाठी इच्छुक नोंदणीकृत, अनुभवी ठेकेदार यांचेकडुन मुख्याधिकारी, घनसावंगी नगरपंचायत, ता. घनसावंगी जि. जालना दरपत्रक पध्दतीने निविदा मागवित आहे. तरी पात्र इच्छुकांनी दि.०१/०८/२०२४ ते दि.०८/०८/२०२४ पावेतो कार्यालयीन वेळेत आवश्यक शुल्क भरुन निविदा दाखल कराव्यात.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरी निविदा संच किमंत | बयाणा रक्कम रू |
|---|---|---|---|
| १. | घनसावंगी नगरपंचायत हद्दीत अंबड-पाथरी रोडवरील दुभाजकात व शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपन करणे बाबत. | २००/- | ५००/- |
| २. | घनसावंगी नगरपंचायत कार्यालयाकरीता इनर्वरटर (UPS+Battery) खरेदी करणे बाबत. | २००/- | ५००/- |
| ३. | घनसावंगी नगरपंचायत हद्दीत स्वच्छ भारत अभियान, माझी वंसुधरा अभियान इ. अंतर्गत शहरात विविध ठिकाणी Information Education व Communication अंतर्गत विविध कामे करणे. | २००/- | ५००/- |
| ४. | घनसावंगी नगरपंचायत करीता Grass Machine Cutter (Petrol Brushcutter) खरेदी करणे बाबत. | २००/- | ५००/- |
| ५. | घनसावंगी नगरपंचायत अंतर्गत विविध ठिकाणी मुरुम पुरवठा करुन पसरविणे बाबत. | २००/- | ५००/- |

- कोणतेही निविदा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार नगरपंचायतने राखून ठेवलेला आहे.
- निविदे बाबत मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती कार्यालयीन वेळेत न.पं.कार्यालयात पहावयास उपलब्ध राहतील.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
घनसावंगी नगरपंचायत


## पान १वरून...

### अवकाळीच्या नुकसान भरपाईसाठी

कोटी एकवीस लक्ष पंचाणव हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. डीबीटी द्वारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी लवकरात लवकर वितरीत करण्यात येणार आहे. याबाबतचा महसूल व वन विभागाचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला.

---------

### मी ढेकणाला आव्हान

अब्दालींशी केली. अमित शाह हे अहमद शाह अब्दालीचे राजकीय वंशज आहेत. नवाज शरीफचा केक खाणारे तुम्ही आम्हाला हिंदुत्व शिकवणार. विश्वासघात करतो तो हिंदू नाही, असे शंकराचार्य यांनी म्हटले होते.तुम्ही आमचा विश्वासघात केला, तुम्ही कसले हिंदू? मुस्लीम लीगशी बंगालमध्ये मांडीला मांडी लावून बसणारे तुम्ही. चंद्राबाबू नायडू, नितीश कुमार हे काय हिंदुत्ववादी आहेत का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. राज्यात देशात हिंदू-मुस्लीमच्या नावाखाली जे सुरु आहे ते सत्ता जिहाद आहे. सत्तेसाठी वाटेल ते, तोडा फोडा आणि राज्य करा असे सगळे सध्या सुरु आहे. जाती पातीत, धर्मांमध्ये भांडणं लावायचे आणि आपली राजकीय पोळी भाजायची. हे हिंदुत्व आम्ही मानत नाही. तुमचे हिंदुत्व काय हे अमित शाहांनी आम्हाला सांगावे, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

--------------

### शरद पवार-एकनाथ शिंदे यांची

अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीसंदर्भात एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली होती. राज्यात मराठा आरक्षणावरून वातावरण तापले आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी १३ ऑगस्टपर्यंत राज्य सरकारला अल्टीमेटम दिला आहे. या पार्श्वभूमीवर पवार आणि शिंदे यांची भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही नेत्यांमध्ये मराठा आरक्षणाबाबत चर्चा झाली. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावर चर्चा सुरू झाली आहे.

-------------

### नाशिकच्या जागेवरुन महाविकास

निवडणूक माजी आमदार वसंत गिते यांनी लढवण्याचा निर्णय घेण्यात आला. ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून एकमुखाने हा ठराव करण्यात आला. मात्र, अशा प्रकारे परस्पर उमेदवारांच्या नावाचा ठराव करण्याला काँग्रेस आणि शरद पवार गटाकडून आक्षेप घेण्यात आला आहे. नाशिक मध्यची जागा कोणत्याही परिस्थितीत काँग्रेस पक्षाला सुटली पाहिजे, असा काँग्रेस बैठकीत ठराव झाल्याची माहिती काँग्रेस प्रवक्त्या हेमलता पाटील यांनी दिली आहे. तर ठाकरे गटाने उमेदवारांची नावे एकमताने ठरवली त्यामुळे त्यांना शुभेच्छा असा खोचक टोलाही शरद पवार गटाचे माजी आमदार नितीन भोसले यांनी लगावला आहे.

----------

### फास्टॅगमध्ये मोठा बदल,

तत्त्वांनुसार हे बदल केले जात आहेत. टोलवरील शुल्क आकारणी सुटसुटीत व्हावी आणि टोल नाक्यांवरील गर्दी कमी व्हावी, यासाठी हे नियम लागू करण्यात आले आहेत. फास्टॅगमध्ये आता पुढील प्रमाणे नियम करण्यात आले आहेत. पाच वर्षं जुने फास्टॅग बदलावे लागणार. फास्टटॅग जर ३ वर्षं जुना असेल तर केवायसी अपडेट करावी लागेल. वाहन नोंदणी क्रमांक, चेसिस क्रमांक फास्टॅगशी लिंक करावा लागणार. नवीन वाहन खरेदी केल्यानंतर ९० दिवसांत नोंदणी आवश्यक. फास्टॅग पुरवणाऱ्या कंपन्या त्यांचा डेटाबेस व्हेरिफाय करतील. वाहनाचा फ्रंट आणि साईडचा फोटो अपलोड करावा लागणार फास्टॅग मोबाईल क्रमांशी लिंक केलेला असला पाहिजे.

------------

### आधी आरोप नंतर पक्षात प्रवेश

नेत्यांना त्यांनी किती त्रास दिला, ते पाहिले आहे, भारतीय जनता पार्टीने ज्या १२ लोकांवर आरोप केले होते ते आज कुठे आहेत. आजचे राजकारण खूप गलिच्छ झाले आहे. निवडणुकीच्या तोंडावर हे बाहेर आले आहे. निवडणुकीच्या आधी पत्र आणि नाव त्यांनी का घेतले असा सवालही यावेळी केला. सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती, धोरणे, महागाई बेरोजगारी, भ्रष्टाचार यांवर लक्ष देणे गरजेचे आहे. आम्ही कधीच कोणावर आरोप केले नाहीत. आरोप केलेले ते शंभर कोटी कुठे आहेत. मग आरोप खोटा ठरला ना, असा खोचक सवालही यावेळी केला.

---------------

### मनू भाकरचा ट्रिपल

त्यात भर पडते की काय याकडे तमाम भारतीयांचे लक्ष लागले होते. मनूने पदकाच्या दिशेने वाटचाल केली होती. पण, मनूला अखेर पदकापासून एक पाऊल दूर राहावे लागले.

-----------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. ४ ऑगस्ट २०२४



## परिवर्तनवादी विचार अंगीकृत करुन मातंग समाजाने महापुरुषांच्या विचारावर चालले पाहिजे–प्रा.डॉ. मिलिंद आवाड

माजलगाव :–साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतिचे आयोजन मानवी हक्क अभियान शाखा माजलगावच्या वतीन येथील वैष्णवी मंगल कार्यालय येथे जयंती सोहळा दि.१ ऑगस्ट रोजी मोठ्या थाटामाटात पार पडला.

समाजाला जर दखलपात्र व्हायचे असेल तर समाजाने परिवर्तनवादी विचार अंगीकृत करुन महापुरुषांच्या विचारावर चालले पाहिजे तरच समाजाची उन्नती होईल व जयंती साजरा केल्याचा हेतू साध्य होऊन हीच महापुरुषांना आदरांजली ठरेल असे मत मानवी हक्क अभियान आयोजित लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव कार्यक्रमात जेएन. यु.विद्यापीठाचे प्राध्यापक तथा मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.मिलिंद आवाड यांनी व्यक्त केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार डी.के.देशमुख प्रमुख पाहुणे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके,मोहनराव जगताप,नारायण डक,रामसेठ राठोड, अभय होके पाटील, दयानंद स्वामी, कचरु खळगे, नानासाहेब घोडके, शेख रशीद,मनोहर डाके,जयदत्त नरवडे,बबन सरवदे, जीवन राठोड यांची प्रमुख उपस्थित होती.

# राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा–माजी आ. भीमराव धोंडे

## कृषी मंत्री धनंजय मुंडे व आ. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत कृषी प्रदर्शनाचे २९ ऑगस्ट रोजी उद्घाटन

**आष्टी । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषि महाविद्यालय यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शन आष्टी येथे होणार आहे.

कृषी मंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे, भाजपाच्या नेत्या आ. पंकजाताई मुंडे, आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे तर समारोप अ. भा. वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे अशी माहिती माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत कृषी प्रदर्शनाबाबत अधिक माहिती देताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, गतवर्षी हे प्रदर्शन उशिरा झाले होते. परंतु यावेळी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात काय पिके घेता येतील त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन प्रदर्शनातून मिळणार आहे. १ लाख २५ हजार शेतकऱ्यांनी गतवर्षी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. कृषी



प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. कृषी प्रदर्शनात जिरेनियम शेती, खेकडा पालन, गोमातेच्या शेणापासून विविध वस्तू कशा निर्माण करायच्या यांची माहिती मिळणार आहे. महिलांनी घरबसल्या घरगुती

**शेतकऱ्यांना हेलीकॉप्टरमध्ये बसण्याची संधी; सलग दुसऱ्या वर्षी होणार स्वामीनाथन कृषी प्रदर्शन**

व्यवसाय करणे, विविध प्रकारचे ट्रॅक्टर व अवजारे, दुध उत्पादक शेतकऱ्यांसाठी वेगवेगळे अत्याधुनिक मशिन, कुक्कुटपालन माहिती तसेच बँके मधून लोन कसे काढायचे यांची माहिती घेणे. गांडूळ खत कसे बनविने मार्गदर्शन, खवय्यांसाठी विदर्भ, कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या भागातील खाद्यपदार्थ खाण्यासाठी व विक्री साठी स्टॉल उपलब्ध असणार आहे. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयतील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला, नाटक, शास्त्रीय संगीत, शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील. गतवर्षी एकुण १०० स्टॉल होते यावर्षी १५० स्टॉल राहतील. शेतकऱ्यांच्या सोबत लहान मुले येतात त्यांच्या मनोरंजनाची सोय करण्यात येणार आहे. गेल्या प्रदर्शनात ७ ते ८ कोटी रुपयांची उलाढाल झाली होती यावर्षी हा आकडा वाढणार आहे. शेतकऱ्यांना हेलीकॉप्टरमध्ये बसण्याची संधी मिळत नाही त्यामुळे यावेळी हेलीकॉप्टर सफरची सोय करण्यात आली आहे त्यासाठी नाव नोंदणी कृषी महाविद्यालयात करावी लागेल हे सफर तिस किलो मिटर अंतरावर सहा हजार रुपये या अल्प दरात होईल. हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आरसुळ एस. आर. उपस्थित होते

# ना. भुजबळ, उपमुख्यमंत्री फडवणीस यांच्या उपस्थितीत रविवारी अरण येथे संत सावता महाराज भक्त परिवार मेळावा

बीड । प्रतिनिधी

अरण, ता. माढा, जि. सोलापूर येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी मंदिर येथे रविवार दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ : ३० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडवणीस, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगनराव भुजबळ आणि गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना. अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भक्त परिवार मेळावा आणि भक्तनिवास वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळा आयोजित केला असून याप्रसंगी बीड जिल्ह्यासह राज्यातील भाविक भक्त आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

रविवारी संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास संत महंत आणि सावता महाराज यांचे वंशज उपस्थित राहणार असून याप्रसंगी ह. भ. प. केशव महाराज उखळीकर (अध्यक्ष जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी), ह. भ. प. रखमाजी महाराज नवले (एकनाथ महाराज वारकरी संस्था पैठण), ह. भ. प. १००८ महामंडलेश्वर मनीषानंद महाराज पुरी (मानवत, जि. परभणी), ह. भ. प. महंत भक्तीदास महाराज शिंदे (श्री तुकाराम महाराज संस्थान बेलखंडी, जि. बीड) यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत. तसेच याप्रसंगी शिरूर लोकसभेचे खा. डॉ. अमोल कोल्हे, नाशिक लोकसभेचे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, विधान परिषदेचे सदस्य आ. योगेश टिळेकर, मान खटाव साताराचे आ. जयकुमार गोरे, विधान परिषदेचे आ. राम शिंदे, नाशिक मध्यच्या आ. फरांदे, विधान परिषदेच्या आ. प्रज्ञाताई सातव, महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रूपालीताई चाकणकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तरी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील संत सावता माळी भक्त परिवार आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने या नेत्रदीपक सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

**बीड जिल्ह्यातून पाच हजार बांधवांची राहणार उपस्थिती**

**रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या श्री संत सावता माळी महाराज भक्त परिवार मेळावा आणि भक्तनिवास वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळ्यासाठी बीड जिल्ह्यातून पाच हजार भाविक भक्त आणि समाज बांधव उपस्थित राहणार असल्याची माहिती समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी दिली आहे.**

**बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविक भक्त आणि समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे – ॲड. सुभाष राऊत**

# सारणीचा गणेश झाला फौजदार विना क्लास झाला एमपीएससी पास

दिनकर जाधव । सारणी

केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील गणेश श्रीराम घोळवे याची नुकत्याच लागलेल्या एमपीएससी परीक्षेच्या निकालामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड झाली आहे. या त्याच्या निवडीबद्दल सर्वच स्तरामधून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

गणेश मुळातच होतकरु असल्याने आणि खाकी वर्दीचे आकर्षण त्याला लहानपणापासूनच होते. कारण गणेशची आत्या पोलीस खात्यामध्ये नोकरी करीत असल्यामुळे तसेच त्याचा चुलत भाऊ हा पोलीस विभागामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असल्यामुळे त्याच्या नजरेत खाकी वर्दी विषयी आकर्षण आणि त्या माध्यमातून जनसेवा करण्याची त्याची मनोमन इच्छा होतीच. त्याला दोन वेळेस अपयश येऊनही तिसऱ्या वेळेस मात्र त्याचे स्वप्न साकार झाले. वडील श्रीराम घोळवे हे गावातीलच शैक्षणिक संस्थेमधून प्रयोगशाळा पर्यवेक्षक पदावर निवृत्त



झाले तर आई गृहिणी आहे. गणेशचे प्राथमिक शिक्षण गावातीलच (सारणी सां.) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे तर माध्यमिक शिक्षण हे छत्रपती संभाजीनगर येथील सेंट लॉरेन्स हायस्कूल येथे पुर्ण झाले, उच्च माध्यमिक हे छत्रपती संभाजीनगर येथील चाटे कनिष्ठ महाविद्यालय येथे पुर्ण झाले तर उच्च शिक्षण पुणे येथीला व्हीआयटी येथे २०१९ मध्ये पुर्ण झाले. शिक्षण पुर्ण झाले परंतु मनात खाकीतला अधिकारी होण्याचे स्वप्न शांत बसू देत नव्हते. त्यामुळे २०२० पासून एमपीएससीचा अभ्यास सुरु केला, दोन परिक्षेत अपयश आले. परंतू गणेशने अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द सोडली नव्हती. एमपीएससी कडून २०२२ ला एकूण ६०३ जागेसाठी जाहिरात प्रकाशित झाली. आक्टोबर २०२२ मध्ये प्रिलियम उतिर्ण होऊन मेन्स परिक्षेसाठी पात्र झाला. या जाहिरातीची मेन्स परिक्षा सप्टें.२०२३ मध्ये झाली तर मुलाखत १२ जुलै २०२४ झाली या परिक्षेत आपला निकाल येणार याची खात्री मनात असल्यामुळे निकालाची ओढ गणेशला होती आणि दि.०१ आगष्ट २०२४ रोजी एमपीएससीचा अंतिम निकाल प्रकाशित होऊन एनटी–ड प्रवर्गातून गणेश पोलिस उपनिरिक्षक झाला. कुठलाही क्लासेस ज्वाईन न करता हे यश गणेशने आपल्या अभ्यासातील सातत्य, चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र यांच्याकडून गणेशवर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आपला वारसा कुणाचा आहे हे आधी समजून घ्या ; प्रबोधनाची चळवळ गतिमान करा – सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सर्वकालीन श्रेष्ठ साहित्यिक, लोकशाहीर, बहुजनांचा हुत्कार, साहित्यसम्राट आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर करीत असताना आण्णा भाऊ साठे प्रेमींनी आपल्याला क्रांतिकारी वस्ताद गुरू लहुजी साळवे, सत्यशोधक महात्मा फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. याची जाणीव असायला पाहिजे असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. तसेच प्रबोधनाची चळवळ गतिमान करा असे आवाहन त्यांनी केले.

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साठे नगर, परळी वेस येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर माजी आमदार पृथ्विराज साठे, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, नगरसेवक बबनराव लोमटे, श्रीमती तौर, भाजयुमोचे शहराध्यक्ष संजय गंभिरे, अनिता जोगदंड, सामाजिक कार्यकर्त्या ॲड.शोभाताई सुनिलराव लोमटे, प्रा.डॉ.अनिल नरसिंगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बळीराम जोगदंड, डॉ.राहुल धाकडे, भिमसेन लोमटे, संतोष नरसिंगे, संकेत मोदी, शेख मुक्तार तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष पत्रकार संजय जोगदंड यांची प्रमुख



उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी साहित्यसम्राट आण्णा भाऊ साठे यांचा गौरवशाली इतिहास अनेक उदाहरणांसह स्पष्ट केला. आपल्या भाषणाने उपस्थित सर्वांची मने जिंकली. आपल्या भाषणात त्यांनी आण्णा भाऊंच्या साहित्यातील प्रत्येक प्रकारांवर चित्रपट निघाले आहेत. इतकं प्रभावी साहित्य आजपर्यंत मराठी साहित्यात झालं नाही हे मत प्रभावीपणे मांडले. आण्णा भाऊंच्या साहित्यातील नायक हा बहुजन आणि शोषित समाजाचे प्रतिनिधित्व करतो व या प्रस्थापित शोषक अन्यायी व्यवस्थेविरूद्ध क्रांतीचा एल्गार पुकारतो. दलित समाजातील फकिराला चित्रपटाचा नायक बनविण्याची ताकद आण्णा भाऊंच्या साहित्यात आहे हे आण्णा भाऊंच साहित्य वाचताना पदोपदी जाणवते असे विचार डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्विराज साठे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे, सामाजिक कार्यकर्त्या ॲड.शोभाताई सुनिलराव लोमटे, बळीराम जोगदंड यांनी ही समायोचित मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीर मामा काळे यांनी केले. तर अध्यक्षीय समारोप संजय जोगदंड यांनी केला. यावेळी कु.प्रतीक्षा वाघमारे हिचा रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून पदस्थपना झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शाहीर तुकाराम यमतेकर व इतर कलाकारांचा प्रबोधनपर गीतगायन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा.महादेव माने, आयोजक मालू भैय्या जोगदंड, मल्हारी जोगदंड, केशव जोगदंड, माऊली नरसिंगे, राहुल जोगदंड, लखन जोगदंड, गोविंद जोगदंड, शंकर गायकवाड, बालाजी जोगदंड, टोपाजी जोगदंड यांच्यासह अनेकांनी पुढाकार घेतला.

# केज मतदारसंघात बौद्ध उमेदवाराला संधी मिळावी – भाई दिपक केदार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्वांत मागासलेला मतदारसंघ म्हणून केज मतदारसंघाची ओळख निर्माण करण्याचे काम दुर्दैवाने ज्याच्या ज्याच्या हातात सत्ता आली. त्या सर्व राजकीय मंडळींनी केले आहे. युवकांना रोजगार नाही, 'एमआयडीसी' नाही, पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. मुलभूत प्रश्न गंभीर आहेत, जातीयता तीव्र आहे. केज मतदारसंघातील अनेक घटनांना वाचा फोडण्याचे काम आम्ही केले आहे. त्याच्यामुळे प्रस्थापित उमेदवारांकडून जनता निराश झाली आहे. हा मतदारसंघ पुढे राखीव राहिल का ? हे निश्चित नाही. मतदारसंघ जोपर्यंत राखीव होता, तो पर्यंत बौद्ध उमेदवाराला संधी मिळाली नाही. त्यामुळे ही शेवटची संधी केज मतदारसंघात बौद्ध उमेदवाराला मिळावी, हा प्रामुख्याने दावा आम्ही करीत असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आम्ही ताकदीने लढणार असल्याचे ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय



अध्यक्ष भाई दिपक केदार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

अंबाजोगाईत शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी भाई दिपक केदार यांनी शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेला प्रदेश उपाध्यक्ष विनोद भोळे, संघटनेचे नवनिर्वाचित प्रदेश सरचिटणीस जीवन गायकवाड, मराठवाडा युवक अध्यक्ष अक्षय भुंबे, महिला जिल्हाध्यक्षा मिनाताई लोंढे, तालुकाध्यक्ष बादल तरकसे यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत बोलताना भाई केदार म्हणाले की, केज विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष (शरदचंद्र पवार गट) खा.शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी सुरू ठेवली असून महाविकास आघाडीने आम्हाला प्रतिनिधित्व दिल्यास मी स्वतः निवडणूकीच्या मैदानात उतरणार आहे. हा नवा चेहराच मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलू शकतो, आलटून–पालटून जे मतदारसंघात सुरू आहे, ते निराशाजनक आहे. खा.बजरंग सोनवणेंच्या अंबाजोगाई येथील जाहीर सभेत मी जी भूमिका मांडली होती, ती भुमिका केज मतदारसंघातील गरीब मराठा, दलित, आदिवासी, मुस्लिम बांधवांना आवडलेली आहे आणि त्यांनीच या मतदारसंघात मी निवडणूक लढवावी, अशी मागणी केलेली आहे. त्यासाठी आम्ही कार्यकर्त्यांशी चर्चा करून तयारी ही सुरू केली असल्याचे भाई केदार यांनी यावेळी सांगितले.

**पालकमंत्र्यांनी मयत मुलाच्या कुटुंबाला न्याय द्यावा :**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी या गावातील तरूणाचे लातूर येथे निर्घृण हत्याकांड झालेले आहे. बीडचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे आणि नवनिर्वाचित आमदार पंकजाताई मुंडे यांनी अद्याप या पिडीत कुटुंबाची भेट घेतलेली नाही आणि त्यांचे सांत्वन ही केले नाही. आपल्या मतदारसंघातील हे पिडीत कुटुंब असल्याने त्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन ही भाई दिपक केदार यांनी पत्रकार परिषदेतून केले.

**ऑल इंडिया पँथर सेना पदाधिकारी निवडी :**

ऑल इंडिया पँथर सेनेच्या प्रदेश सरचिटणीसपदी जीवन गायकवाड तर मराठवाडा युवक अध्यक्षपदी अक्षय भुंबे यांची निवड राष्ट्रीय अध्यक्ष भाई दिपक केदार यांनी नियुक्तीपत्र देवून यावेळी केली. संघटनेचे काम वाढविण्यासाठी आणि संघटना मजबूत करण्यासाठी प्रदेश सरचिटणीसपदी जीवन गायकवाड आणि मराठवाडा युवक अध्यक्षपदी अक्षय भुंबे यांची निवड करण्यात आली आहे. या दोघांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

## पान १वरून...

### कपडे बदलल्यासारखे नेते

असे आम्हाला कळले, धनूभाऊ योजनेला विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री महोदय निधी देऊ शकतात अन नगर विकास खाते देखील त्यांच्याकडेच आहे, मग फोनही उपमुख्यमंत्री यांच्याकडे बैठक कशासाठी हे अजूनही कळले नाही.

असो काहीही करा पण डीपीसी मधून दिला जाणारा निधी तातडीने द्या अन हो हाच प्रकार धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गवरील सर्व्हिस रोड, स्लिप रोड अन उड्डाणपूलाबाबत आहे बर का धनूभाऊ. कोणाच्या जमिनीचा भाव वाढावा हा उद्देश नाहीच आहे, आजपर्यंत या रस्त्यावर अपघात होऊन वीस लोक मृत्यूमुखी पडले आहेत, त्यामुळे हे काम होणे आवश्यक आहे, पण आपले काही पत्रक बहाद्दर लोक यात सुद्धा अरेतुरे ची भाषा करत आहेत, आम्हाला त्याच्याशी देणेघेणे नाही, पण अटल अमृत योजना सुरु करण्याचा विषय असो कि नॅशनल हायवे वरील स्लिप रोड चा विषय असो दोन्ही विषय जनतेच्या जिव्हाळ्याचे आहेत, यात राजकारण करू नका अन तातडीने हे विषय मार्गी लावा. पालकमंत्री यांचे सध्या असलेले समर्थक म्हणतात की, बीडच्या आमदारांनी काहीच काम केले नाही. ठीक आहे, पण एक गोष्ट सर्वश्रुत आहे की, बीडचे आमदार संदीप क्षीरसागर हे जर पक्षाचे विचार सोडून जनतेशी गद्दारी करून सत्तेत सहभागी झाले असते तर सगळी कामे अगदी तातडीने पूर्ण झाली असती. पण पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याने त्यांचे काम सातत्याने अडविले जाते हे सर्वांना माहीत आहे. परंतु लोकांना प्रामाणिक नेता आणि त्याची प्रामाणिक भूमिका आवडत असते. याचा प्रत्यय नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत आलेला आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड शहराध्यक्ष तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती खुर्शिद आलम यांनी म्हटले आहे.

### विना अनुदान शिक्षक व

अनेक बंधू –भगिनी दुग्ध व्यवसायातून गाय–म्हैस बैलांचे संवर्धन करीत आहे.जगाला सकस अन्नधान्य व पौष्टिक दूध पुरवठा करीत आहेत, परंतु,या शेतकरी व युवकांची शिक्षकांची व्यथा शासनाने समजून घेतली पाहिजे.आज अनेक बेरोजगार मुले जर्सी गावरान व गीर गाईचे पालन करीत आहेत.परंतु दुधाला भावच नाही यामुळे निराशा आहे.शासनाने पैठण– पंढरपूर पालखी मार्ग काम पूर्ण करावे.शिक्षक बंधू–भगिनींना व दूधवाल्या भावाला न्याय द्यावा.माननीय एकनाथ दादा, अजितदादांनी अनेकांना न्याय दिला.परंतु,कष्टकरी व इमानदार मराठा समाज आरक्षण प्रश्न,शिक्षक व दूधवाल्या भावाला गरिबीत व उपेक्षित ठेवले आहे.या घटकांना न्याय द्यावा अशी मागणी आष्टी मतदार संघ काँग्रेसचे युवा नेते रविंद्र ढोबळे यांनी केली आहे.

### आम्ही मंजूर केलेली कामे

होईल हे शहरातील लोकनेते गोपीनाथ मुंडे नाट्यगृह उभारण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब चंद्रकांत दादा पाटील साहेब पंकजाताई मुंडे साहेब यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्रातील पहिल्यांदाच ही जागा हस्तांतरित झाली त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले परंतु ही जागा हस्तांतरित झाली मी केलेल्या प्रयत्नांना कदाचित नियती म्हणून पुन्हा मी आमदार झाल्यावरच त्याचे काम सुरू होईल असे वाटते तसेच उमरी येवता येतील गायरान जमिनीवर औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत ज्यामुळे तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याची संधी मिळेल त्यासाठी लागणाऱ्या पूर्ण तयारी झाली होती फक्त पाण्याची एक समस्या राहिली होती त्यासाठी कृष्णा खोरेतून तीन पीएमसी पाणी मिळवण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने प्रयत्न केला होता कदाचित हेही काम मी आमदार झाल्यानंतर पूर्ण होईल अशी नियती असावी. केज मतदार संघात कन्स्ट्रक्टिव्ह काम करण्यासाठी मी माझ्या काळात पूर्ण प्रयत्न केलेले आहेत धनेगाव धरणाखाली पर्यटन विभागाकडून एक छानशी बाग बोटिंग वगैरे करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत तेही काम कदाचित माझ्याच हाती होईल असे सांगताना विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर चांगलाच आसूड ओढला तसेच माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी सांगितले की माझ्या आमदारकीच्या काळात नेकनूर येथील बस स्टॅन्ड तसेच पाच सब स्टेशन चे काम मी करण्याच्या प्रयत्न केला होता सब स्टेशनचे काम पूर्ण झाले पूर्ण होत आले आता कदाचित मी नव्याने आमदार झाल्यावर त्याचे उद्घाटन होईल त्यामुळे मागील पाच वर्षांपूर्वी मी ज्या ज्या कामासाठी प्रयत्न केले ती कामे अद्यापही तसेच अवस्थेत आहेत विद्यमान आमदारांनी त्यासाठी काहीच प्रयत्न केले नाहीत व ते काम मी माझ्याच पुढील कार्यकाळात पूर्ण व्हावी अशी नियत असावी असे पत्रकारांशी बोलताना माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी सांगितले तसेच जनतेला कधीही डीपी दवाखाना या कामासाठी वाट पाहावी लागत नव्हते हे जनसेवेची कामे करून घेण्यासाठी अधिकारी असतात फक्त अधिकाऱ्यांनी काम करावे या सूचना देण्याचे काम मी केले होते व माझ्या काळात महिना महिना दोन दोन महिने डीपी मिळाली नाही असे कधीही झाले नाही तसेच दवाखान्यात उपचार घेण्यासाठी कोणाच्याही शिफारशीची गरज कधी लागली नाही असे बोलून विद्यमान आमदारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आता मी २०२४ ची निवडून निवडणूक लढवणार असल्याचे ठामपणे सांगून भारतीय जनता पक्षाकडे तिकिटाची मागणी केलेली आहे जर त्यांनी मला उमेदवारी नाकारली तर बाकीच्या पर्यंत नक्कीच विचार केला जाईल परंतु निवडणूक मी लढवणारच यावर माजी आमदार संगीता ठोंबरे ठाम आहेत.

### अंगणवाडीचे चांगले अहवाल

पकडण्यात आले आहे.त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे आष्टी जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई मा. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर मुकुंद अधाव, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रति छत्रपती संभाजी नगर, श्री शंकर शिंदे, पोलीस उप–अधीक्षक,बीड यांचे मार्गदर्शनाखाली. श्री. गुलाब बाचेवाड, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. बीड, व पोलीस अंमलदार श्रीराम गिराम, सुदर्शन निकाळजे, अमोल सरसाडे, अंबादास पुरी चालक गणेश म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड यूनिट यांनी कारवाई केली आहे.

### संत शिरोमणी श्री नामदेव

तर प्रमुख पाहुणे म्हणून यावर्षीच्या सोहळ्याचे सचिव श्री राजेंद्र रापतवार, समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक डीगंबरराव दरवेशवार, समाजाच्या ज्येष्ठ भगिनी सौ.गीता बालाजी टेंभुरवार व सौ स्वाती नितीन गिरगिरवार हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्या सौ.गिता टेंभुरवार, सौ.स्वाती गिरगिरवार, श्री डीगंबरराव दरवेशवार श्री राजेंद्र रापतवार,श्री सुदर्शन रापतवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विजय रापतवार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री संदीप दरवेशवार यांनी केले.यानंतर संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची महाआरती संपन्न झाली व शेवटी सर्व समाज बांधवांची महाप्रसाद म्हणून भोजन व्यवस्था करण्यात आली. सदरील संजीवन समाधी सोहळ्यासाठी समाजातील सर्व पुरुष महिला अतिशय उत्साहाने सहभागी झाले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी यावर्षीच्या संजीवन समाधी सोहळ्याचे अध्यक्ष श्री विश्वनाथ गिरगिरवार व सचिव श्री राजेंद्र रापतवार व समाजाचे अध्यक्ष श्री प्रवीण संगेवार यांच्या मार्गदर्शना खाली सर्व बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

cmyk

# जागतिक कृषी निर्यातीत भारताने राखले आठवे स्थान; जागतिक व्यापार संघटनेची माहिती

पुणे : २०२३ मध्ये जागतिक कृषी निर्यातीत घसरण होऊनही भारताने वर्षभरात जगातील आठव्या क्रमांकाचा कृषी उत्पादनांचा निर्यातदार म्हणून आपले स्थान कायम राखले आहे अशी माहिती जागतिक व्यापार संघटनेने दिली आहे. २०२२ साली भारताची निर्यात ५५ अब्ज डॉलर होती ती २०२३ साली घसरून ५१ अब्ज डॉलर इतकी झाली. कृषी निर्यातीत घसरण होऊनही आठव्या क्रमांकावर स्थान राखण्याचे कारण म्हणजे पहिल्या दहा देशांपैकी सात देशांनी एकत्रित केलेल्या निर्यात आकडेवारीत घट झाली आहे.

कृषी उत्पादनांच्या प्रमुख निर्यातदारांपैकी ब्राझील, युरोपियन यूनियन आणि थायलंड यांनी २०२३ मध्ये त्यांची निर्यात अनुक्रमे ६ टक्के, ५ टक्के आणि ०.२ टक्क्यांनी वाढवली. पहिल्या १० मधील इतर सात अर्थव्यवस्थांनी त्यांच्या कृषी निर्यातीत घट केली. शीर्ष दहा निर्यातदारांनी २०२३ मध्ये जागतिक निर्यातीत ७१.९ टक्के वाटा दर्शविला.




भारतातील कृषी निर्यात कमी होण्याचे कारण भू-राजकीय घटक जसे की लाल समुद्राचे संकट आणि रशिया-युक्रेन युद्ध हे आहे. परंतु ही घसरण मुख्यत्वे तांदूळ, गहू, साखर आणि कांदे यांसारख्या नियमन केलेल्या वस्तूंमध्ये होती, असे भारतातील अधिकाऱ्यांनी यापूर्वी निदर्शनास आणून दिले. भारताने मे २०२२ मध्ये गहू, जुलै २०२३ मध्ये बिगर बासमती तांदूळ आणि ऑक्टोबर २०२३ पासून साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली होती. युरोपियन यूनियनने २०२२ मधील ७९९ अब्ज डॉलरच्या तुलनेत २०२३ मध्ये ८३६ अब्ज डॉलर मूल्याच्या कृषी उत्पादनाची निर्यात करून आपले अव्वल स्थान कायम राखले. २०२३ मध्ये कृषी निर्यातीत २२२ अब्ज डॉलर्सच्या विरूद्ध १९८ अब्जपर्यंत घसरण होऊनही अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे. ब्राझीलची कृषी निर्यात २०२२ मधील १४८ बिलियन डॉलरच्या तुलनेत २०२३ मध्ये १५७ अब्ज डॉलर वाढली त्यामुळे या देशाचे तिसरे स्थान कायम आहे. २०२३ मध्ये चीन हा चौथा सर्वात मोठा कृषी निर्यातदार होता ज्याची शिपमेंट ९५ अब्ज होती जी २०२२ मध्ये ९६ अब्जच्या निर्यातीपेक्षा किरकोळ कमी होती. टॉप टेन कृषी निर्यातदारांमध्ये कॅनडा, मेक्सिको, इंडोनेशिया आणि ऑस्ट्रेलियाचा समावेश आहे.

# सोन्याप्रमाणे चमकणारी 'सोनपरी शेळी'; खास वैशिष्ट्यांमुळे जास्त मागणी

भारतामध्ये शेळ्यांच्या अनेक जातींमध्ये सोनपरी शेळीची जात खूप लोकप्रिय आहे. या जातीच्या शेळीपालनातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा मिळवता येतो. जाणून घेऊ या शेळीची वैशिष्ट्ये.

सोनपरी शेळीची वैशिष्ट्ये : सोनपरी शेळी ही बेरारी शेळी आणि ब्लॅक बंगाल या दोन शेळीच्या संकराने तयार झाली आहे. या शेळीची खास गोष्ट म्हणजे या शेळीची कातडी चमकदार असल्यामुळे ही सोन्यासारखी दिसते त्यामुळे तिला सोनपरी असे म्हणतात. ही शेळी प्रामुख्याने मांसासाठी पाळली जाते. त्याच्या मांसाला बाजारात चांगली मागणी आहे.

शरीर रचना : सोनपरी जातीच्या शेळीचा रंग तपकिरी किंवा काळा असतो. त्याच्या मागच्या बाजूला डोक्यापासून शेपटीपर्यंत एक काळी रेष असते ज्यामुळे ती अधिक उठून दिसते. त्याच्या मानेवर एक काळे वर्तुळ असते. शेपटी मागे वक्र झालेली असते. कान पानाच्या आकाराचे असून खालच्या दिशेने वाकलेले असतात. शिंग चपटे असून बाहेरच्या बाजूस पसरलेले असतात. या शेळीचे वजन साधारणपणे ३५ ते ४० किलो असते. ही शेळी दरवर्षी ३ ते ४ पिलांना जन्म देते. त्यामुळे लहान पशुपालक अल्पावधीत या शेळीचे पालन करून लाखो रुपये सहज कमवू शकतात. सोनपरी शेळीची किंमत : सोनपरी शेळीच्या मांसाला बाजारात चांगली मागणी असल्याने त्याची किंमतही बाजारात चांगली आहे. इतर शेळ्यांच्या तुलनेत सोनपरी बोकडाची बाजारातील किंमत २२ ते २५ हजार रूपयांपर्यंत आहे. अशा परिस्थितीत या शेळीचे पालनपोषण करून चांगले उत्पन्न मिळू शकते. सोनपरी शेळीची देखभाल : सोनपरी शेळीच्या देखभालीसाठी विशेष व्यवस्था करावी लागत नाही. घराच्या एका कोपर्यातही बांधून ठेवू शकता. ही शेळीही झाडाची पाने खाऊन जगते. याशिवाय फळे, भाज्या, हिरवे गवत इत्यादी खाते. सोनपरी शेळी उष्ण व कोरड्या हवामानात सहज राहू शकते.



# फक्त २४ रुपये भरून मिळवा, 'पाईपलाईन अनुदान योजनेचा' लाभ



शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शासन या योजना राबवते. शेतकऱ्यांना विविध बाबींसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून दिले जाते. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या सिंचनासाठी देखील शासनाकडून वेगवेगळ्या बाबींसाठी अनुदान दिले जात आहे. शेतीमधून जर शाश्वत उत्पादन मिळवायचे असेल तर पाण्याची आवश्यकता असते. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या माध्यमातून पाईपलाईन अनुदान योजना राबवली जात आहे. या योजनेत अंतर्गत किती अनुदान मिळते आणि यासाठी कुठे अर्ज करावा लागतो याबाबत थोडक्यात जाणून घेऊया.

किती अनुदान मिळते? : शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईपसाठी ३५ रुपये प्रति मीटर या प्रमाणे पाचशे मीटर पर्यंत अनुदान मिळते. या अंतर्गत कमाल १५,००० रुपयाचे अनुदान दिले जाते. तसेच एचडीपी पाईप साठी पन्नास रुपये प्रति मीटर याप्रमाणे ३०० मीटर पर्यंत अनुदान दिले जाते. या अंतर्गतही कमाल १५,००० रुपयांचे अनुदान मिळते.

अनुदानासाठी अटी व नियम : योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वत:च्या नावावरती सातबारा उतारा असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असावा. लाभार्थी शेतकरी जर दारिद्र्य रेषेखालील असेल, तरच त्याला पाईपलाईन अनुदान योजनेचा लाभ दिला जाईल. योजनेसाठी जे शेतकरी अर्ज करणार आहेत, त्यांच्याकडे एक हेक्टर किंवा कमीत कमी एक एकर जमीन असणे गरजेचे आहे. या योजने अंतर्गत शासनाकडून पाईप खरेदीसाठी ५०% अनुदान दिले जाते, उर्वरित रक्कम शेतकऱ्याला स्वत:कडील भरावी लागेल. पाईपलाईन अनुदान योजनेचा लाभ घेणारा शेतकरी महाराष्ट्र राज्याचा मूळ रहिवासी असावा. राज्याबाहेरील शेतकऱ्याला या पाईप लाईन अनुदान योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

अर्ज कुठे करावा लागतो? : पाईपलाईन अनुदान योजनेअंतर्गत कमाल १५,००० रुपयांचे अनुदान मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावा लागतो. अर्ज करतांना पाण्याच्या स्रोताची माहिती द्यावी लागते. महाडीबीटी पोर्टल वर अर्ज केल्यानंतर लॉटरी काढली जाते. यात अर्ज केलेल्या शेतकऱ्याचे नाव आल्यास त्याला काही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. जमिनीचा सातबारा, ८ अ, बँकेचे पासबुक व ज्या ठिकाणी आपण पाईप खरेदी करणार आहोत, त्या डीलरशिपचे कोटेशन इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागतात. महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर हा अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांना शुल्क म्हणून फक्त २३.६० रुपये भरावे लागतात. अर्थातच २४ रुपयात अर्ज केल्यानंतर पंधरा हजार रुपयांचे अनुदान पाईप खरेदीसाठी दिले जाते.

# ऊस बेणे मळ्याचे व्यवस्थापन

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस लागवडीखालील जमिनीची पाच भागांमध्ये विभागणी करावी. प्रत्येक वर्षी एका भागात बेणे बदल करावा. साधारणपणे गवताळ वाढ, काणी, रेड रॉट आणि वायएलडी अशा रोगामुळे ऊस उत्पादनामध्ये १० टक्के घट येऊ शकते. ही घट बेणे बदल करून टाळता येऊ शकते.

लागण वेळ : बेण्याचे वय ८ ते १० महिन्यांचे असताना तोडले जावे. शेतकरी कोणत्या महिन्यात जास्त लागण करतो, त्यानुसार पाठीमागे जाऊन बेणे मळा लागण करावी.

जमीन : जमीन ही क्षारपड, चोपण किंवा पाणथळयुक्त नसावी. बेणेमळा हा कारखाना कार्यक्षेत्राच्या विविध गटांत आणि वेगवेगळ्या जातींचा घेतलेला असावा. शेतकऱ्यांना बेणे वितरणासाठी सोयीचे असावे. बेणे मळ्यापासून चांगल्या रस्त्याची सोय असावी त्यामुळे वाहतूक खर्च कमी करता येईल. बेणे मळ्यासाठी प्रगतिशील शेतकऱ्यांची निवड करावी. मूलभूत बियाणे हे कारखाना रोपवाटिका किंवा संशोधन केंद्रावरून आणलेले असावे. त्याचे गुणन करून बेणे मळ्यासाठी वापरावे.

जमीन मशागत : चांगली खोलवर नांगरट करून उभी-आडवी वखरणी करावी. उसाच्या चांगल्या वाढीसाठी जमिनीत २५ ते ३० टन एवढे चांगले कुजलेले शेणखत दुसऱ्या वखरणी अगोदर मिसळून मातीआड करावे किंवा शेणखत उपलब्ध नसेल तर १० टन चांगली कुजलेली प्रेसमड मिसळावी किंवा ५ टन गांडूळ खताचा वापर करावा.

बेणे : बेण्याची निर्मिती एक डोळा, दोन डोळा, कांडी किंवा उती संवर्धित रोपांपासून केली जाते.



बेण्यासाठी लागण केलेला ऊस तोडण्यापूर्वी ६ आठवडे अगोदर अतिरिक्त नत्र खताची मात्रा द्यावी त्यामुळे कांडीतील रसरशीतपणा व पोषणद्रव्य वाढून बेण्याची उगवण क्षमता वाढीस लागते. व्यवस्थितरीत्या पाला काढून बेणे धारदार कोयत्याने थोडे तिरक्या पद्धतीने एका झटक्यात तोडावे म्हणजे कांडी फुटणार नाही किंवा डोळा खराब होणार नाही, शक्यतो बेणे शेतावर नेऊन तिथेच तोडून बेणे प्रक्रिया करून लागण करावी. मूळकुज, कांडीकुज यांसारख्या रोगांच्या नियंत्रणासाठी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम मिसळून त्यामध्ये बेणे १० ते १५ मिनिटे भिजत ठेवावे.

सरीरातील अंतर : जमिनीच्या पोताप्रमाणे ४.५ ते ५.० फूट १५ ते २० सेंटिमीटर दोन डोळ्यांतील अंतर ठेवून लागण करावी. बेणे तोडताना डोळ्याच्या वरचा १/३ व खालचा २/३ भाग ठेवून टिपरी तोडावी, वरंब्याच्या बगलेला डोळे येतील याप्रमाणे दोन डोळा टिपरी सरीत ठेवून डोळ्यावर दोन ते अडीच इंच माती लावून कोरडी लागण करून हलक्या प्रवाहाने पाणी द्यावे. नेहमीच्या बेण्याचे गुणन १ : १० ते १ :१२ असे होते म्हणजे १ हेक्टर क्षेत्रावर तयार केलेल्या बेणेमळ्यातून साधारणपणे १० ते १२ हेक्टर लागण होते. परंतु हा बेणेमळा उती संवर्धित रोपांचा वापर करून केल्यास त्याचे १:२० ते १:२५ प्रमाणे गुणन होऊ शकते.

बेणे टिपरी संख्या : हेक्टरी २५ हजार दोन डोळा टिपरीचा वापर करावा. उष्ण बाष्प हवा प्रक्रिया केलेले बेणे हे मूलभूत बेण्यासाठी वापरताना २५ टक्के जास्तीचे बेणे लागण करावी. कारण उष्ण बाष्प हवा प्रक्रियेमुळे कमकुवत बेणे मरण पावतात.

आंतरमशागत : योग्य वेळी बाळ बांधणी, मोठी बांधणी तसेच खुरपणी व एकात्मिक तण व्यवस्थापन करावे. बेणे मळ्यामध्ये रोगग्रस्त (काणी, गवताळ वाढ) बेटे तसेच दुसऱ्या ऊस जातीची बेटे दिसून आल्यास ती तत्काळ काढून नष्ट करावीत. बेणेमळ्यातील उसाचे पाचट काढू नये.

रासायनिक खतांची मात्रा : बेणेमळातील जोमदार वाढीसाठी नेहमीपेक्षा खत मात्रा जास्त द्यावी लागते. लागणीच्या वेळी सरीत ५० किलो नत्र, ७० किलो स्फुरद आणि ७० किलो पालाश द्यावे. प्रति हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट १० किलो आणि मॅग्नेशिअम सल्फेट लागणीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावे. लागणीनंतर एक महिन्याने ५० किलो, दोन महिन्यांनंतर १०० किलो तिसऱ्या व चौथ्या महिन्यानंतर ५० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. मोठ्या बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश एकत्रित मिसळून मोठी बांधणी करावी. मोठ्या बांधणीनंतर एक व दोन महिन्यांनी ५० किलो नत्र पाण्यातून किंवा ठिबक सिंचनमधून द्यावे. ऊस बेणे प्लॉट तोडणीपूर्वी राहिलेले १०० किलो नत्र प्रति हेक्टरी द्यावे. एक हेक्टर बेणेमळा क्षेत्रासाठी ५ टन गांडूळ खत, ६०० किलो नत्र, २३० किलो स्फुरद आणि १२० किलो पालाश खत मात्रेची शिफारस आहे.




## महत्वाच्या घटना

१६६६ : नेदरलँड्स (डच) आणि इंग्लंड देशांत झालेल्या समुद्री युद्धात इंग्रज सैन्यांनी विजय मिळविला.
१८५४ : जपानच्या जहाजातून अधिकृत पणे हिनोमारा ध्वज वापरण्यात सुरवात झाली.
१८७० : युद्धाच्या वेळी आजारी व जखमी सैनिकांना मदत करण्यासाठी लंडन या देशांत ब्रिटीश रेड क्रॉस सोसायटीची स्थापना करण्यात आली.
१८८६ : कोलंबिया देशाच्या राज्यघटनेनुसार कोलंबिया चे नाव बदलून अमेरिका करण्यात आले तेव्हा त्यांनी नवीन संविधान स्वीकारले.
१९१४ : पहिले महायुद्ध जर्मनीने बेल्जियमवर चढाई केली. प्रत्युत्तरादाखल युनायटेड किंग्डमने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने तटस्थ असल्याचे जाहीर केले.
१९२४ : सोविएत युनियन व मेक्सिकोमधे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९३५ : ब्रिटीश सरकारने गवर्नमेंट ऑफ इंडिया ऐक्टला मंजुरी दिली.
१९४७ : जपानच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.
१९५६ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे 'अप्सरा' ही भारताची सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.
१९६७ : तेलंगाना राज्यातील कृष्ण नदीवर बांधण्यात आलेला जगातील सर्वात लांब दगडी नागार्जुन सागर धरणाचे उद्घाटन करण्यात आलं.
१९८४ : 'अपर व्होल्टा' या देशाचे नाव बदलुन 'बुर्किना फासो' असे करण्यात आले.
१९९३ : राजेन्द्र खंडेलवाल या पुण्याच्या अपंग परंतु जिद्दी साहसवीराने समुद्रसपाटीपासून १८,३८३ फुटांवर असलेली 'खारदुंग ला' ही खिंड आपल्या चार सहकार्यांसह स्कुटरवरुन (कायनेटिक होंडा) पार केली. त्याच्या या कामगिरीची 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस' मधे नोंद झाली.
१९९८ : फिलिपाइन्सच्या माजी अध्यक्षा कोरेझॉन अ‍ॅक्विनो यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठीचा 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२००१ : मरणोत्तर त्वचादान करुन दुसर्यांना जीवनदान देणारी, भारतातील पहिली स्किन बँक मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात स्थापन झाली.
२००७ : नासा चे फिनिक्स हे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.
२००८ : भारत सरकारने शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एससीआय) नवरत्न दर्जा प्रदान केला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२२ : मेवाड राजघराण्यातील १२ वे शासक व राजस्थान राज्यातील उदयपुर शहराचे संस्थापक तसचं, महाराणा प्रताप यांचे वडिल राणा उदय सिंह यांचा जन्मदिन.
१७३० : सदाशिवराव भाऊ पानिपतच्या तिसर्या युद्धातील सरसेनापती (मृत्यू: १४ जानेवारी १७६१)
१८२१ : लुई व्हिटोन कंपनीचे निर्माते लुई व्हिटोन यांचा जन्म. (मृत्यू: २७ फेब्रुवारी १८९२)
१८३४ : जॉन वेन ब्रिटिश गणितज्ञ (मृत्यू: ४ एप्रिल १९२३)
१८४५ : सर फिरोजशहा मेहता कायदेपंडित, समाजसुधारक व राजकीय नेते, उत्तम प्रशासक व काँग्रेसचे एक संस्थापक. १९१३ मधे 'बॉम्बे क्रॉनिकल' हे इंग्रजी भाषेतील पहिले राष्ट्रीय बाण्याचे वृत्तपत्र त्यांनी मुंबईत सुरू केले. (मृत्यू: ५ नोव्हेंबर १९१५)
१८६३ : महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकर पातंजलीच्या संकृत महाभाष्याचा मराठीत अनुवाद करणारे विद्वान (मृत्यू:)
१८८८ : भारतीय धर्मगुरू ताहेर सैफुद्दीन यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९६५)
१८९४ : नारायण सीताराम तथा ना. सी. फडके साहित्यिक व वक्ते (मृत्यू: २२ आक्टोबर १९७८)
१९२९ : आभासकुमार गांगुली तथा किशोर कुमार पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक, त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. 'चलती का नाम गाडी' सारख्या निखळ विनोदी चित्रपटाबरोबरच 'दूर गगन की छाँव में' सारखे गंभीर चित्रपटही काढले. (मृत्यू: १३ आक्टोबर १९८७)
१९३१ : नरेन ताम्हाणे यष्टीरक्षक आणि फलंदाज (मृत्यू: १९ मार्च २००२)
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी एन. रंगास्वामी यांचा जन्म.
१९६१ : बराक ओबामा अमेरिकेचे ४४ वे आणि पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते
१९७८ : भारतीय राजकारणी संदीप नाईक यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२२१ : चीनी सम्राज्ञी लेडी जेन यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १८३)
१०६० : हेन्री (पहिला) फ्रान्सचा राजा (जन्म: ४ मे १००८)
१८७५ : हान्स अँडरसन डॅनिश परिकथालेखक (जन्म: २ एप्रिल १८०५)
१९३७ : डॉ. काशीप्रसाद जायस्वाल प्राच्यविद्या पंडित व कायदेतज्ञ (जन्म: २७ नोव्हेंबर १८८१)
१९७७ : नोबेल पुरस्कार विजेते इंग्रजी फिजिओलॉजिस्ट एडगर ॲड्रियन यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १८८९)
१९९७ : जीन काल्मेंट १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८७५)
२००३ : नोबेल पुरस्कार विजेते अमेरिकन बालरोगतज्ञ फ्रेडरिक चॅपमॅन रॉबिन्स यांचे निधन. (जन्म: २५ ऑगस्ट १९१६)
२००६ : नंदिनी सत्पथी भारतीय लेखक व राजकारणी (जन्म: ९ जून १९३१)
२०२० : शिवाजीराव पाटील निलंगेकर महाराष्ट्राचे वे१० मुख्यमंत्री (जन्म: ४ ऑगस्ट १९३१)

# तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता उद्योगाकडे वळावे

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; बीडमध्ये स्वयंरोजगार मेळाव्यात ६६५ जणांची नोंदणी

बीड। प्रतिनिधी

स्वयंरोजगार मेळाव्यातून स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. नोकरीच्या मागे न धावता तरूणांनी उद्योगाकडे वळावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयात स्वयंरोजगार मेळाव्याचे शुक्रवारी (दि.२) उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. या मेळाव्यात ६६५ जणांनी नोंदणी केली असून प्रातनिधिक स्वरूपात ५ तरुणांना कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप केले.

व्यासपीठावर रा.काँ.चे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजयेंद्र झा, शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, मेळाव्याचे समन्वयक संकेत निकम, पोनि.शीतलकुमार बल्लाळ, एसबीआयचे मुख्य व्यवस्थापक विजय



### शेकडो तरुणांच्या हाताला काम मिळेल-डॉ.सरिका क्षीरसागर

शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आपण अनेकांना नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु सर्वांना नोकरी मिळणे शक्य नाही. आपल्या भागात अनेक तरुण रोजगाराच्या शोधात आहेत. अनेकांनी नोकरीसाठी स्थलांतर केले आहे. रोजगाराची निकड लक्षात घेता सर रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. यातून शेकडो तरुणांना रोजगार मिळेल, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

सेलवटकर, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी विजय काकड, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे, माजी नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, रवींद्र कदम, सय्यद इलियास, ॲड.विकास जोगदंड, बिभीषण लांडगे, अच्युतराव शेळके, जैतूल्ला खान सुनील झोडगे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, अल्पसंख्याक सेलचे शहराध्यक्ष माजेद कुरेशी, सरपंच अमोल बागलाने, शंकर चव्हाण, नितीन साखरे, विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, युवा नेते दत्तप्रसाद सानप आदींची उपस्थिती होती. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, बीड मतदारसंघातील व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी स्वयंरोजगार मेळावा ही सुवर्णसंधी आहे. या मेळाव्यातून फास्ट फूड, इडली-डोसा विक्री केंद्र, भाजीपाला विक्री, पर्यटन आदी व्यवसायांसाठी ८० ते ९५ टक्के बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात सबसिडी, व्याज परतावाचा लाभ मिळेल. यासाठी बँकांसह विविध आर्थिक विकास महामंडळांनी सर्वोतपरी सहकार्य केले आहे. या मेळाव्यातून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबध्द आहे, मेळाव्याला मिळणारा प्रतिसाद पाहता पुन्हा एकदा अशाच मेळाव्याचे आयोजन करू, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. प्रास्ताविक डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार ॲड.राजेंद्र राऊत यांनी मानले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, सर्व बँकांचे व्यवस्थापक, विविध महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, कर्मचारी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते. या मेळाव्याचा शेकडो तरुणांनी लाभ घेतला.

### प्रातनिधिक स्वरूपात कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप

स्वयंरोजगार मेळाव्यात अनेकांना अर्ज भरून घेऊन थेट लाभ देण्यात आला. प्रातनिधिक स्वरूपात ५ तरुणांना कर्ज मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप देखील करण्यात आले. या मेळाव्यात शेकडो तरुण, लाभार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी विविध बँकांचे अधिकारी, महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

## थोडक्यात




### वसंतदादा पाटील महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील जयंती

पाटोदा: येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांत ३ ऑगस्ट रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, प्रो. सतीश माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, डॉ. अशोक नागरगोजे, प्रा. मनिषा गाढवे, ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत आदि उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रो. प्रशांत पाटील यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील भरीव कार्याचे तसेच सामाजिक व राजकीय कार्याचे महत्व विषद केले. आभारप्रदर्शन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### घनश्याम मुंडे सेवानिवृत्त

दिंद्रुड: माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक तथा पर्यवेक्षक घनश्याम आप्पाराव मुंडे बुधवारी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त त्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम शाळेच्या वतीने घेण्यात आला. घनश्याम मुंडे यांनी गेल्या ३३ वर्षांपासून सिंदफणा प्रसारक मंडळाच्या विविध शाळांत ज्ञान दानाचे पवित्र कार्य केले. दिंद्रुड वडवणी व टाकरवन येथील माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्य करत असताना शेकडो विद्यार्थी घडवले. बुधवारी टाकरवन येथे सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम मुख्याध्यापक दिपक राऊत यांच्या अध्यक्षतेखाली ह.भ.प. हरिदास महाराज सोळंके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सदाशिव शिंदे,भगवानराव मोरे, हनुमान वराट, विवेकानंद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सेवानिवृत्ती निमित्त घनश्याम मुंडे यांचा सपत्नीक सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष शिवाजी रांजवन व सचिव प्रताप रांजवन यांनी भावी निरोगी व सदृड आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांशी मिळत्यात जुळता स्वभाव व लाघवी स्वभावामुळे मुंडे सरांच्या सेवानिवृत्तीने शिक्षकांसह विद्यार्थ्यांना गहिवरून आले होते.



## आदित्य शिक्षण संस्थेतील १७ विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यशस्वी

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर भविष्यात त्यांना उपयोगी पडणारे विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात. वेगवेगळ्या परिक्षांबदल येथे मार्गदर्शन मिळते. त्यामुळे येथील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत.

भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालयाच्या निर्देशानुसार फार्मसी क्षेत्रातील एम. फार्म व तत्सम इतर उच्च शिक्षणाकरिता राष्ट्रीय स्तरावर ही परीक्षा महत्त्वाची तसेच अनिवार्य आहे. भारत सरकारच्या नॅशनल बोर्ड एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस यांच्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या ह्या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भारत सरकार तर्फे दरमहा १२ हजार ५०० रूपये शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिक्षवृत्तीसाठी आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

आदित्य शिक्षण संस्थेतील फार्मसी महाविद्यालयाचे तब्बल १७ विद्यार्थी जीपीएट- २०२४ या परीक्षेत १०० पेक्षा अधिक गुण घेऊन यशस्वी झालेले आहेत. त्यापैकी जयदीप नागणे व प्रथमेश परकळे हे दोन विद्यार्थी भारत सरकार तर्फे फार्मसी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकरिता दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

तर संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा आणि वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदीती सारडा यांनी संस्थेत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतूक केले.

याच वर्षी नायपर-जेईई २०२४ या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षेतही संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केलेले आहे. आदित्य शिक्षण संस्थेत प्राचार्य डॉ. संतोष जैन, डॉ.प्राची उदापूरकर तसेच फार्मसी विभागाच्या सर्व प्राध्यापकांच्या विशेष प्रयत्नातून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना / सारख्या स्पर्धा परीक्षेच्या तयारी करिता विशेष मार्गदर्शन व सराव परीक्षा घेतल्या जातात.

## स्व. प्रशांत जोशी यांच्या कुटुंबियांना मिळाली शासनाची १ लाखाची मदत

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अखेर मराठी पत्रकार परिषदेच्या पाठपुराव्याने दै मराठवाडा साथीचे दिवंगत कार्यकारी संपादक प्रशांत जोशी यांच्या पत्नी श्रीमती जयश्री प्रशांत जोशी यांच्या बँक खात्या मध्ये शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधून १ लाख रुपये जमा झाल्याने जोशी कुटुंबीयांनी मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

पत्रकार परिषदेचे सदस्य राहिलेले प्रशांत प्रभाकर राव जोशी यांचे काही महिन्या पूर्वी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या मुळे त्यांच्या परिवारास मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तातडीची मदत तर दिलीच शिवाय राज्य शासनाच्या शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधून आर्थिक मदत मिळावी या साठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा एस एम देशमुख व किरण नाईक, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्तात्रय अंबेकर यांनी जिल्हा माहिती अधिकारी बीड यांच्या मार्फत प्रस्ताव दाखल केला.

जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठनकर व माहिती अधिकारी सौ अंजली निमसरकर आणि त्या नंतर संभाजी नगर येथील विभागीय माहिती संचालक किशोर गांगुर्डे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हा प्रस्ताव माहिती व संचालनालय मुबंई यांच्या कडे पाठवला. हा प्रस्ताव माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुबंई येथे गेल्या नंतर एप्रिल महिन्या मधेच या प्रस्तावाच्या आधारे १ लाख रुपये मंजूर करण्यात आले. जुलै महिन्याच्या २५ तारखे पर्यंत मंजूर झालेले १ लाख रु स्व प्रशांत जोशी यांच्या पत्नीच्या खात्यात जमा न झाल्याने परत विलास डोळसे, दत्तात्रय अंबेकर यांनी पाठपुरावा सुरू केला. मा किरण नाईक यांनी स्वतः मंत्रालयात जाऊन माहिती घेतली असता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागातील घाडगे मॅडम यांच्या कडुन सांगण्यात आले की २२ एप्रिल रोजीच पैसे जयश्री जोशी यांच्या खात्यावर पाठवले. या संदर्भात सखोल माहिती घेतल्या नंतर समजले की काही तांत्रिक अडचणी मुळे हे पैसे जयश्री जोशी यांच्या खात्यात जमा झाले नव्हते. ही बाब घाडगे मॅडम यांच्या लक्षात आल्या नंतर त्यांनी लागलीच सर्व बाबीची पूर्तता करून १ ऑगस्ट रोजी घाडगे मॅडम यांनी जयश्री जोशी यांच्या बँक खात्यावर १ लाख रु पाठवले आणि ती रक्कम त्यांना प्राप्त ही झाली. या सर्व पाठपुराव्यात मा धनंजय मुंडे यांचे स्वीयसहाय्यक प्रशांत जोशी सह मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, विभागीय संघटक सुभाषजी चौरे, डिजिटल मीडियाचे कार्याध्यक्ष अनिलजी वाघमारे यांचे ही सहकार्य लाभले. मराठी पत्रकार परिषदेच्या पाठपुराव्याने १ लाख रु मिळाल्याने संपूर्ण जोशी कुटुंबियांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## क्रांतीदिनी पुणे येथील विधानभवनावर ट्रॅक्टर मोर्चा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतीमालावरील निर्यातबंदी रद्द करावी, गायीच्या दुधाला डिझेल एवढी तर म्हशीच्या दुधाला पेट्रोल प्रमाणे किंमत मिळावी,आमदार, खासदारांची पेन्शन रद्द करावी, सैनिकांना 'वन रँक,वन पेन्शन'तातडीने लागू करावी, दोन साखर आणि इथेनॉल कारखान्यातील हवाई अंतराची अट रद्द करावी, वन्य जीव प्राणी संरक्षण कायदा आणि गोवंश हत्या बंदी कायदा रद्द करावा आदी. मागण्याकरिता पुणे येथील विधानभवनावर दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता. क्रांतीदिनी शेतकरी संघटना आणि भारतीय जवान किसान पार्टीच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चा आयोजित केला आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी दिली.



लाडकी बहीण,फुकट रेशन सारख्या योजना आणून विधानसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी एकनाथ शिंदे सरकारने कंबर कसली आहे. शेतकऱ्यांची दीड लाखाची,दोन लाखाची कर्जमाफी,प्रोत्साहन अनुदानाचे ५० हजार रुपये तसेच अतिवृष्टी,दुष्काळी अनुदान,पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम द्यायला मात्र सरकारकडे पैसे नाहीत.साखर कारखान्यांनी ऊसाचे कोट्यावधी रुपये थकविले आहेत. बाजार समिती मधून शेतीमालाला आधारभूत किंमत दिली जात नाही तसेच शेतीमालावर निर्यात बंदी करून शेतकऱ्यांचे जाणीवपूर्वक नुकसान केले जाते. दररोज १४ कोटी लिटर दूध गोळा केले जाते आणि दुधाचा वापर मात्र ६४ कोटी लिटर आहे.जागतिक आरोग्य संघटनेने लक्षात आणून दिल्यानंतरही दुधातील भेसळ थांबवली जात नाही. लेकरा बाळांना भेसळयुक्त दुधाचा पुरवठा होत आहे. पामतेल आयात करून सर्व खाद्यतेलामध्ये मिसळून विकले जात आहे. पुणे,मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर,अमरावती सारख्या मोठ्या शहरातून ड्रगचा खुलेआम व्यापार सुरू आहे.दूध माफिया,तेल माफिया यांना अभय दिले जात आहे. कायदा,सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून गुन्हेगारांना मोकळे रान करून दिले आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी ट्रॅक्टर मोर्च्याचे आयोजन केले आहे. ट्रॅक्टर मोर्चाचे नेतृत्व शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील, भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे, सुभेदार रणजित सोळंके, क्रांतिसिंह नाना पाटील ब्रिगेडचे अध्यक्ष शिवाजी नांदखिले,उपाध्यक्ष ॲड.अजित काळे, सुरेंद्र अंबुलगे,मराठवाडा प्रमुख बंडू सोळंके, पश्चिम महाराष्ट्र प्रमुख ॲड.पांडुरंग रायते, विदर्भ प्रमुख लक्ष्मीकांत कौठकर, मुंबई विभाग प्रमुख ॲड.गणेश घुगे, महिला आघाडी प्रमुख विमलताई आकनगिरे,वंदना माळी, जयश्री पाटील आदी.करणार आहेत. ट्रॅक्टर मोर्चा यशस्वी करण्यासाठी सर्व जिल्हयामधून प्रयत्न केले जात आहेत. शेतकरी आणि जवानांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

## जिजाऊ मल्टीस्टेट गैरव्यवहार प्रकरणात एमपीआयडी १९९९ प्रस्तावास लवकरच मान्यता मिळणार

बीड। प्रतिनिधी


जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव रकमेच्या गैरव्यवहार गुन्ह्यातील ठेवीदारांची वित्तीय संस्थामधील हित संबंधांचे संरक्षण अधिनियम एमआयडी १९९९ अंतर्गत जिल्हा प्रशासनामार्फत प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. १५ जुलै दरम्यान राज्याचे उप मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब यांची भेट घेऊन सदरील प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन अधिसूचनेत प्रसिद्धी द्यावी अशी मागणी ठेवीदारांच्या वतीने केली असून, हा प्रस्ताव मान्यता देण्यासाठी मंत्रालय स्तरावर गृह विभागात तातडीची कार्यवाही चालू आहे. लवकरच या प्रस्तावास राज्य सरकार मान्यता देणार आहे. आवश्यकता वाटल्यास जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदार शिष्ट मंडळाची ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देणार अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट बीड बँकेचे अध्यक्षा अनिता बबन शिंदे पती बबन विश्वनाथ शिंदे,अध्यक्षांचे कुटुंबीय, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने ठेवीदारांच्या सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. या विरोधात पो. स्टे. शिवाजीनगर गु.र.न. ३६०/ २०२३ कलम ४२०,४०६,४०९,३४,१२० (ब) भा.द.वि, सह कलम ३,४ एम आय डी १९९९ प्रमाणे असे तीन गुन्हे बीड पोलिसात व एक गुन्हा धाराशिव जिल्ह्यात दाखल आहे. गुन्ह्यातील आरोपींची स्थावर/ जंगम मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय आस्थापने मधील) हित संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत तपशीलवार प्रस्ताव मा. अप्पर पोलीस महासंचालक ( आ. गु. शा.) महाराष्ट्र राज्य मुंबुई यांच्याकडून मा. प्रधान सचिव विशेष गृह विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर आहे. सदरील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गुन्ह्यातील आरोपी व संबंधातील व्यक्तींची मालमत्ता शोधून जप्तीची कारवाई करणे करिता महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी तत्सम वरिष्ठ अधिकारी नेमून ठेवीदारांची रक्कम परत करणे करिता सरकारकडून प्रयत्न केले जातील. मुख्य आरोपी बबन शिंदे याला अटक करावी व एम आयडी १९९९ अंतर्गत गुन्ह्यातील आरोपींची मालमत्ता जप्त करावी. अशी मागणी घेऊन ठेवीदार रस्त्यावर उतरले होते.भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी ठेवीदारांच्या मागणीची दखल घेऊन, राज्याचे गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी दाद मागितली आहे.

## डॉ. महेश थोरवे : आष्टी-पाटोदा-शिरूर' मध्ये परिवर्तनाचा नवा युवा चेहरा

आष्टी। प्रतिनिधी

राज्य विधानसभेची घोषणेची वाट पाहत असताना बरेच नवे चेहरे रिंगणात उतरण्यास इच्छुक आहेत. प्रत्येक मतदार संघामध्ये कृतिशील नवे चेहरे या निवडणुकीचे वेगळेपण राहू शकते, तसेच सर्व राजकीय पक्ष उमेदीच्या नवीन नेतृत्वाचा शोध घेत आहेत त्यातच बीड जिल्ह्यातील आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघातून उच्च शिक्षित, समाजाची जाण असलेले आणि राजकारणाची समीकरणे बदलण्याची धमक असणारे डॉ .महेश थोरवे यांच्या नावाची सर्वच स्तरातून चर्चा होऊ लागली आहे. यांच्या नावामुळे या मतदार क्षेत्रात राजकीय समीकरणे बदलून प्रस्थापितांना समर्थ आणि सक्षम पर्याय मिळण्याची दाट शक्यता आहे. प्रश्न तो एवढाच उरला आहे की आता कोणत्या पक्षातून ते आपली उमेदवारी घोषित करतील राष्ट्रवादी पक्ष शरदचंद्रजी पवार गटाचे बीड जिल्ह्यामध्ये वर्चस्व निर्माण झाले आहे. बजरंग सोनवणे यांचा लोकसभा



जनतेला नवीन चेहरा हवा आहे. त्यातच मला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद बघता व जनसामान्य लोकांकडून होणारा आग्रह म्हणून मी स्वतः आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातून येणारी विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असून मा. पवार साहेबांनी संधी आणि आशीर्वाद दिले तर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास सज्ज आहे. - डॉ. महेश थोरवे

बीड मतदार संघात झालेला विजय व वाढलेले महत्त्व तसेच जातीय ध्रुवीकरण यामुळे या उमेदवारीला महत्व प्राप्त झाले आहे, त्यातच सूत्रांनुसार, डॉ. महेश थोरवे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाकडून नवा चेहरा म्हणून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

डॉ. थोरवे यांचे शरद पवार साहेबांशी असलेले प्रत्यक्ष संबंध तसेच पूर्ण पवार कुटुंबाशी असणात त्यांचा अनुबंध, मतदार संघासह संपूर्ण महाराष्ट्रभर असणारा त्याचा दांडगा जनसंपर्क, कार्यकुशलता, युवकांमध्ये असणारी त्यांची लोकप्रियता, मतदार संघातील राजकीय कार्यकर्त्यांमधून त्यांना मिळणारा दुजोरा, मतदार संघातील काही बड़्या नेत्यांचा पाठिंबा, जनमत आणि जनमताद्वारे उमेदवार बदलांचे संकेत या सर्व बाबी यांच्या उमेदवारीला पुष्टी देणाऱ्या आहेत. जातीय समीकरणातून चर्चिल्या गेलेल्या आणि लोकसभा निवडणुकीत अटीतटीचा सामना झालेल्या बीड जिल्ह्याकडे आता सर्वच पक्षांचे लक्ष वेधले. तोंडावर आलेल्या २०२४ विधानसभा निवडणुकीत आता बीड जिल्ह्यात काय चित्र असेल यावर अवघा महाराष्ट्र डोळे लावून पाहत आहे. जातीय समीकरणे आणि मतांचे ध्रुवीकरण करू शकणार्या उमेदवाराला संधी मिळु शकते आसे असताना प्राथमिक स्तरावर इच्छुक उमेदवारांची बरीच नावे बीड जिल्हातील अनेक विधानसभा मतदार संघातून पुढे येऊ लागली आहेत. त्यापैकी आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातून डॉ. महेश थोरवे यांच्या नावाची सर्वच स्तरातून चर्चा सुरु झाली आहे. जनतेच्या अपेक्षा नुसार या मतदारसंघात उच्चशिक्षित आणि समाज परिवर्तनाची दिशा असणा-या व्यक्तीकडे अधिक कौल असेल. शैक्षणिक प्रशासक, नियोजन आणि निष्पादन तज्ञ, सामाजिक कृतीवादी कार्यकर्ता, लेखक, कवी, कलाकार व कुशल वकृत्व असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ. महेश थोरवे यानी यापूर्वी विविध शासकीय-निमशासकीय जबाबदारया सांभाळलेल्या आहेत साहित्य, समाजकारण, उद्योजकता व प्रशासन व्यवस्था अशा सर्वच स्तरावर असणारा त्यांचा सहज वावर त्यांची बाजू भक्कम करतो. त्यामुळे विधानसभेची उमेदवारी त्यांना मिळावी अशी मागणी मतदारांकडून होत आहे. सर्व सामान्यामध्ये मिसळणारे आणि सर्वांच्या मदतीसाठी रचनात्मक पातळीवर कार्यकुशल असणारे व्यक्तिमत्त्व ही त्यांची आजवर राहिलेली ओळख आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी असणारे हे व्यक्तिमत्व आता लोक प्रतिनिधी म्हणून आष्टी-पाटोदा-शिरुर मध्ये परिवर्तनाचा नवा उमदा चेहरा राहील यावर मतदार संघात जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. यामुळेच डॉ. महेश थोरवे हे मतदार संघासाठी नवा उमदा चेहरा असू शकतात अशी शक्यता वर्तवली जात आहे. विरोधकांना दखल घ्यायला भाग पाडेल असा हा चेहरा किती आश्वासक राहू शकतो? लोकांची पसंती किती विश्वासाने पूर्ण होईल आणि थोरवे यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडेल का याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११२३/२०२४**

**रमेश किसनराव देशमुख वि. निरंक (मार्फत - ॲड. जी. एस. घुगे)**

CNR.No.MHBI0200021932024

अर्जदार :- १. रमेश किसनराव देशमुख, वय ६६ वर्ष, धंदा-शेती व समाजसेवा, रा. श्रीराम नगर सिडको ता. जि. औरंगाबाद ह. मु. पिंपळनेर ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत किसनराव गणपतराव देशमुख व रूकमीनबाई किसनराव देशमुख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत किसनराव गणपतराव देशमुख यांचा मृत्यु दिनांक ०८/११/२००५ रोजी घाटी हॉस्पीटल औरंगाबाद येथे झाला व रूकमीनबाई किसनराव देशमुख यांचा मृत्यु दिनांक २९/०४/२०११ रोजी राहते घरी त्यांचा मृत्यु झाला आहे वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार मयत किसनराव गणपतराव देशमुख व मयत रूकमीनबाई किसनराव देशमुख यांचा मुलगा आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत किसनराव गणपतराव देशमुख व रूकमीनबाई किसनराव देशमुख यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.**प्रकरणातील पुढील तारीख १२/०९/२०२४ आज दिनांक ०३ माहे ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

स्वाक्षरित
क. लिपीक.

(शिक्का)

# कपडे बदलल्यासारखे नेते आणि पक्ष बदलणाऱ्यांनी एकनिष्ठांना शिकवू नये- खुर्शिद आलम

**बीड । प्रतिनिधी**

तीन लाख बीड शहर वासियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून आठ कोटी रुपये मंजूर केले जाणार असल्याची माहिती मिळाली अन हसूच आवरेना झाले. पालकमंत्री महोदय, बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि माजी आ सय्यद सलीम वर्षभरापासून हेच तर सांगत अन मागत आहेत. तुम्ही श्रेयासाठी दोन वर्ष बीडच्या नागरिकांना वेठीस धरले अन न्यायालयात जायला भाग पाडले.

बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी तयार केलेल्या अटल अमृत योजनेत वीज जोडणीसाठी महावितरण विभागाने ३८ कोटींची थकबाकी भरण्याची अट नगर पालिकेला घातली. मात्र हे पैसे उपलब्ध नसल्याने डीपीसी मधून याची तरतूद करावी किंवा सरकारने विशेष बाब म्हणून हा निधी द्यावा यासाठी तीन अधिवेशनात आ संदीप क्षीरसागर यांनी हा प्रश्न मांडला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेली योजना केवळ वीज जोडणीमुळे सुरु होऊ शकलेली नाही हे देखील सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. धनूभावू आपण मंत्री आहात हे रेकॉर्ड आपल्याला सहज उपलब्ध होईल, एकदा सभागृहाचे रेकॉर्ड काढून बघा.



बर ते जाऊ द्या, जिल्हा वार्षिक योजनेतून म्हणजेच डीपीसी मधून पैसे द्यावेत ही मागणी आ क्षीरसागर यांनी जानेवारी २०२४ च्या बैठकीत केली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या दालनात देखील बैठक घेऊन समजावून सांगितले होते. पण आपण दुर्लक्ष केले. याचेही रेकॉर्ड उपलब्ध आहे, एकदा चेक करा.

१० नोव्हेंबर २०२३ रोजच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून विशेष सवलती दिल्या जाव्यात असा निर्णय निर्गमित करण्यात आला होता. दरम्यान ज्याप्रकारे कोरोना काळात आमदार निधी, खासदार निधी, डीपीडीसी, शासनाचे विविध प्रकारचे निधी 'कोवीड रिलीफ' साठी वळविण्यात आले होते. त्याचप्रकारे बीड जिल्ह्यात दुष्काळ असल्याने व बीड शहराचा मुलभूत असलेला पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदारांचा, खासदरांचा निधी वळविण्यात यावा अशी मागणी डीपीडीसी बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी केली होती.

आपण पालकमंत्री आहात, आमच्यापेक्षा सिनियर आहात, नेत्याशी एकनिष्ठ आहात, त्यामुळे आपल्याला विरोधीपक्ष नेतेपद असो कि मंत्रिपद मिळालं. त्यामुळे आपण बीड वासियांची अडचण दूर कराल असं वाटलं होत. पण काही कानफुक्या मुळे आपण बीडच्या लोकांना दोन वर्ष वेठीस धरलं. मग पाच दहा लाख खर्च करून या विषयावर न्यायालयात जावं लागलं.

धनूभाऊ जर का पालकांनी दुर्लक्ष केल, मायबाप सरकारने कानाडोळा केला तर न्यायालयाची पायरी चढावीच लागते. नाहीतर पाच दहा लाख खर्च करून कोर्टात जायची कोणाला हौस नव्हती.

पालकमंत्री महोदय, कोरोनाच्या काळात राज्य सरकारने लोकप्रतिनिधी यांचा निधी अत्यावश्यक सेवेसाठी वर्ग केला होता, त्या जो आर मध्ये म्हटल्याप्रमाणे दुष्काळी परिस्थिती मध्ये डीपीसी चा निधी वापरता येतो, हे आ संदीप क्षीरसागर यांनी आपल्या समोर बैठकीत मांडले, नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारणे बीड जिल्हा दुष्काळी जाहीर केला, त्यानंतरच टंचाई या हेड खाली डीपीसी मधून निधी देण्याची मागणी केली, आपण तो निधी दिला मात्र तब्बल वर्ष दीड वर्ष उशिराने. आपण पालक आहात एवढा उशीर करून कस चालेल.

कोर्टाने हा नागरिकांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न असल्याने तातडीने बैठक घेण्याचे सांगितले मात्र त्यातही आपण दोन दिवस बैठक पुढ ढकलली, आता दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक होणार ◀◀ पान ३ वर

# विना अनुदान शिक्षक व दूधवाल्या भावाला न्याय द्या- रविंद्र ढोबळे

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील मराठा समाजाला न्याय मिळण्याची गरज आहे.मराठा व कुणबी एकच आहेत.कुणबीचे सगळे सोयरे यांनाही कुणबी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे.यासाठी अनेक पक्ष व समाजाची इच्छा आहे.महायुती सरकारने राज्यातील लाडक्या बहिणींना वेतन जाहीर केले.परंतु, खेडेगाव शहर व दुर्गम भागात शिक्षण व अन्नधान्य,दूध पुरवठा करणारा शेतकरी गरीब झाला आहे.राज्यात उद्धव ठाकरे साहेबांनी कायम विना अनुदानित



शाळांना २०/४०% अनुदान मंजूर केली.काम करणारे शिक्षकांना धीर आला.परंतु,आज अनेक शिक्षक विना अनुदानावर काम करीत आहेत. या शिक्षकांचे आई-वडील कुटुंब व मुला-मुलींचा खर्च मोठा आहे.तरी पण शासनाने विना अनुदानित शाळांना अनुदान दिले नाही.आता या शिक्षकांना अनुदान दिले पाहिजे.खेडेगावात डोंगरी दुर्गम व माळरानावर अनेक शेतकरी व युवक गोपालन करीत आहे.सेंद्रिय शेती व पशुधनाची स्वच्छता पाळून दर्जेदार दूध तयार करीत आहेत.परंतु,या दुधाला राज्यात भावच नाही.दुधापेक्षा बिसलरी व खुराक महाग झाले आहेत. दूधवाला भाऊ आज तोट्यात जात आहे.तरीपण जागतिकीकरण व पुण्य कर्म समजून ◀◀ पान ३ वर

# आम्ही मंजूर केलेली कामे पण अजुन पूर्ण होऊ शकली नाहीत -माजी आमदार ठोंबरे

**केज । प्रतिनिधी**

माजी आ. संगीता ठोंबरे यांनी विद्यमान आ. नमिता मुदडा यांच्या निष्क्रियता बद्दल आभार व्यक्त केले व आम्ही आमच्या काळात जनहिताच्या मंजूर केलेल्या योजना पण या पाच वर्ष मध्ये पूर्ण होऊ शकले नाही हे दुर्दैवी आहे. कदाचित आम्ही मंजूर केलेल्या कामाचे उद्घाटन आमच्याच हस्ते व्हावे असे नियतीच्या मनात असावे असे संगीता ठोंबरे यांनी केज येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हणाल्या.



माजी आमदार संगीता ठोंबरे या केज मतदार संघतून निवडणूक लढवण्यावर ठाम असून त्यांनी मतदारसंघात त्यांचा एक दौरा कंप्लिट झाला असून केज मतदार संघातील नागरिकांनी त्यांना भरघोस असा प्रतिसाद देत आहे विद्यमान आमदारावर प्रचंड नाराज असणारी जनता व जनता आमदारांच्या हस्तक्षेपामुळे त्रस्त झाले असल्यामुळे समोर कोण येणार याची वाट पाहत होता आणि संगीता माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्या माध्यमातून एक चांगला आमदार पुन्हा पाहायला मिळेल अशी लोकांना अपेक्षा आहे लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी अगदी ठामपणे मी उभारणारच असे सांगितले आहे सध्या तरी भारतीय जनता पक्ष यांच्याकडेच उमेदवारी मागितली आहे परंतु समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाईल परंतु २०२४ ची निवडणूक ही माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी निवडणूक लढणारच आहे यावर त्या ठाम आहेत असे दिसून येते या पत्रकार परिषदेत बोलताना संगीता ठोंबरे म्हणाले की माझ्या पाच वर्षाच्या कालावधीत जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळाली त्यासाठी मी जनतेची ऋणी आहे व मी काम करण्याची पूर्ण क्षमतेने प्रयत्न केला आहे ते शहरात उभारणारे लोकनेते गोपीनाथ मुंडे सभागृह तसेच औद्योगिक क्षेत्रात लोकनेते गोपीनाथ मुंडे सहकारी सूतगिरणी उभारण्यासाठी प्रयत्न केले. सूतगिरणी लवकरच सुरू ◀◀ पान ३ वर

# अंगणवाडीचे चांगले अहवाल पाठविले म्हणून मागितली लाच; एसीबीची कारवाई

**आष्टी । प्रतिनिधी**

शासनाच्या १० जानेवारी २०२४ च्या जीआर प्रमाणे वर्धित होउन मोठी अंगणवाडी झाली आहे.त्यासाठी आम्ही आपले अंगणवाडी चे चांगले अहवाल पाठविल्याने तुमची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे.त्यामुळे आम्हाला बक्षीस म्हणून ५००० रुपये द्या म्हणून ५००० रुपये लाच मागणी अमृता श्रीकांत हाट्टे व नीता मालदोडे यांनी केली.व पाच हजार रुपये लाच रक्कम स्विकारत असतांनाच या दोघींना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड यांनी रंगेहाथ पकडले.

आष्टी येथील एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालतील पर्यवेक्षीका अमृता श्रीकांत हाट्टे,(वय ३६ वर्ष) व कनिष्ठ सहायक नीता रामदास मलदोडे (वय २९ वर्ष) यांनी सदरची अंगणवाडी ही मिनी अंगणवाडी होती.ती महाराष्ट्र शासनाच्या १० जानेवारी २०२४ च्या जीआर प्रमाणे वर्धित होउन मोठी अंगमवाडी झाली आहे.त्यासाठी आम्ही आपले अंगणवाडी चे चांगले अहवाल पाठविलेले आहेत.त्यामुळे तुमची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे. आम्हाला बक्षीस म्हणून ५००० रुपये लोकसेवक हाट्टे व मलदोडे हे ५०००/- रुपये लाचेची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली. त्यावरुन दिनांक ३०/०७/२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता यातील तक्रारदार यांना आलोसे मांनी मिनी अंगणवाडी असतांना चांगले अहवाल पाठविलेले आहेत.त्यामुळे शासनाचे जीआर प्रमाणे तकारदार यांची पगार ६००० रुपये वरुन १०००० रुपये झाली आहे आम्हाला बक्षीस म्हणून ५००० रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन ती स्वतः स्विकारण्याचे मान्य केले.त्यानुसार दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सापळा लावला असतां एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, पंचायत समीती, आष्टी येथे आलोसे श्रीमती. हाट्टे व मलदोडे यांनी पंचासमक्ष ५०००/ (पाच हजार रुपये) लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात ◀◀ पान ३ वर

# निष्क्रिय तहसिलदार हाय हाय..च्या घोषणा करत उपोषणकर्त्यांनी तहसिल कार्यालय दणाणून सोडले

**आष्टी । प्रतिनिधी**

कडा शहरातील असलेला डॉ.बाबासाहेबांचा पुतळा रस्त्यांच्या मध्यभागी बसवा या मागणीसाठी उपोषण सध्या साबलखेड ते आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतीपथावर सरू असून,कडा शहरात असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हा मुख्य रस्त्याच्या मध्यभागी बसविण्यात यावा या मागणीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे उपोषण आष्टी तहसिल समोर सुरु करताच, आष्टीचे तहसीलदार प्रमोद गायकवाड यांनी उपोषणकर्त्यांची भेट न घेता येथून पळ काढल्याने उपोषणकर्त्यांनी निष्क्रिय तहसिलदार हाय हाय..च्या घोषणाबाजी करत तहसिल कार्यालय दणाणून सोडले.

याबाबत अधिक माहिती अशी गेल्या वर्षभरापासून साबलखेड-आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. सध्या हे काम कडा शहरात सुरू असून,येथील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात येत आहे.या महामार्गावर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील असलेला डॉ.आंबेडकरांचा पुतळा हा रस्त्याच्या मध्यभागी बसावा म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे यशवंत खंडागळे यांनी आष्टी तहसील कार्यालयात आमरण आज शुक्रवार दि.२ रोजी सकाळी ११ वा.उपोषण सुरू केले आहे.उपोषण सुरू करताच आष्टीचे तहसीलदार प्रमोद गायकवाड यांनी उपोषणकर्त्यांची भेट न घेताच येथून पळ काढला.त्यामुळे संतप्त झालेल्या उपोषणकर्त्यांनी तहसीलदार विरोधात घोषणाबाजी करत प्रशासनाच्या विरोधातही घोषणाबाजी केली.जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही.तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार यशवंत खंडागळे वोळी यावोळी दिला.यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# कै.भास्कर शिनगारे यांच्या पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर शहरातील जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. भास्करराव शिनगारे यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त भास्कर प्रेम प्रतिष्ठान व कै.भास्कर शिनगरे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन दिनांक १२ ऑगस्ट २०२४ सोमवार रोजी करण्यात आले आहे.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धारूर शहरातील जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे भाग्यविधातेक कै. भास्करराव शिनगारे यांच्या पुण्यतिथी निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे प्राथमिक गटासाठी वक्तृत्व स्पर्धा जनता प्राथमिक विद्यालयांमध्ये होणार असून यासाठी ,अरे माणसा माणसा कधी होशील रे माणूस हा विषय देण्यात आला आहे या स्पर्धेत यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय तृतीय उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत

तसेच माध्यमिक गटासाठी वादविवाद स्पर्धा जनता माध्यमिक विद्यालय मध्ये होणारा स्पर्धेतून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील प्रथम ,द्वितीय, तृतीय , उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत यासाठी विद्यार्थ्यांच्या अपयशाला पालकांना जबाबदार धरणे योग्य की अयोग्य हा विषय देण्यात आला आहे. स्पर्धेला नियम व अटी असून याबाबतची सर्व माहिती आयोजकांकडून उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी जनता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वास शिनगारे मो. नंबर ९४ २१ २७ ६४ १७ तसेच माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीमा गायकवाड मोबाईल नंबर ९४ २०० २७३२९, सौ.जयश्री रणदिवे मॅडम ९२८४५७६७७१, सौ. उज्वला शिनगारे मॅडम ९८३४४९९८६५, मंत्री सर ९८९००७८५९१ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन कैलासवासी भास्कर प्रेम प्रतिष्ठान यांच्यावतीने करण्यात आले आहे.



# सरपंच त्रिंबक साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळा (फ.) येथे जवळा ग्रामपंचायतीचे सरपंच त्रिंबक जिजा साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना अतिशय दर्जेदार शालेय साहित्य वाटप

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत विनायक चोपडे यांच्यातर्फे पुस्तक वाटप करण्यात आले, या सामाजिक उपक्रमांनी विद्यार्थी आनंदी झाले,यावेळी सदस्य विलास शिंदे, सौदागर शेडगे, मुख्यध्यापक आदिनाथ चांडबोधले सर, राम व्हरकटे सर (सहशिक्षक), , भाग्यशाला करपे, आरती स्वामी (सहशिक्षिका), सर्व शिक्षक, गावकरी उपस्थित होते.

# संत शिरोमणी श्री नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा उत्साहात संपन्न

अंबाजोगाई प्रतिनिधी

संत नामदेव बी सी ग्रुप व बीड जिल्हा शिंपी समाजाच्या वतीने संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा कार्यक्रम गेल्या ५ वर्षापासून सुरू करण्यात आला व या ६ व्या वर्षी सुद्धा हा संजीवन समाधी सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला.

सदरील संजीवन समाधी सोहळया मध्ये सकाळी सुरुवातीला कलश मांडून संत श्री नामदेव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर आकाशवाणी व दूरदर्शन गायक श्री शिवकुमार मोहेकर सर यांचा ''नामदेव महाराज अभंग गाथा''हा संगीतमय सुश्राव्य असा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये श्री मोहेकर



सर यांनी संत नामदेव महाराज यांचे विविध अभंग अतिशय सुंदर रित्या गाऊन त्याचे विस्तारीकरण करून सांगितले. यानंतर गेल्या ५ वर्षापासून प्रत्येक वर्षी संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात समाजातील गुणवंत व प्रतिभावंत सन्मान या उपक्रमा मध्ये चि.रामेश्वर संतोष टेंभुरवार या विद्यार्थ्याने केमिस्ट्री विषयात श्री योगेश्वरी महाविद्यालयातून ७८ % गुण संपन्न करून प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल व कु.ऋतुजा पंकज रापतवार या विद्यार्थिनी ने १० वी बोर्ड परीक्षेत ९३ टक्के गुण संपादन केल्याबद्दल समाजाच्या वतीने सन्मानचिन्ह शाल व पुष्पगुच्छ देऊन पालकासह त्यांचा सन्मान करण्यात आला,तसेच समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री सुदर्शन रापतवार यांचीअंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल त्यांचाही सन्मानचिन्ह शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

सदरील गुणगौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत शिरोमणी श्री नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा २०२४ चे अध्यक्ष श्री विश्वनाथराव गिरगिरवार ◀◀ पान ३ वर

# कुदळे,म्हस्के,मोरे यांच्या मध्यस्थीने यशवंत खंडागळे यांचे सुटले उपोषण

**आष्टी । प्रतिनिधी**

कडा शहरातील असलेला डॉ.बाबासाहेबांचा पुतळा रस्त्यांच्या मध्यभागी बसवा या मागणीसाठी डा. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी आष्टी तहसिलसमोर अमरण उपोषण सुरु केले होते.उपोषणाला उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे,भाजपचे तालुकाध्यक्ष ॲड.साहेबराव म्हस्के, नायब तहसिदार बाळदत्त मोरे,माजी सभापती अशोक इथापे,अशोक पवार,मुरली फसले,रामशेठ मधुरकर, माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे,दिपक गरुड ,संदीप जाधव यांनी भेटी दिल्या. लेखी आश्वासन पत्रात म्हाटले आहे की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा

कडा येथील पुतळा रस्त्याच्या मध्यभागी घेण्यात यावा.या मागणीसाठी दि.२ आगस्ट रोजीपासून आपण आमरण उपोषण सुरु केले आहे.संबंधित राष्ट्रीय महामार्गचे उपविभागीय अभियंता यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.या प्रकरणी निर्णय घेणेच्या अनुषंगाने तहसील कार्यालय आष्टी येथे उपविभागीय अधिकारी पाटोदा, विषयांकित मागणीशी सर्व संबंधितांना बैठकीस बोलवून दि.७ आगस्ट रोजी बैठक घेवून निर्णय घेण्यात



येईल.म्हणून आपण आमरण उपोषण तूर्त मागे घेवून प्रशासनास सहकार्य करावे अशी विनंती केली आहे. साबलखेड - कडा-आष्टी ते चिंचपूर या राज्य महामार्गाचे सध्या रस्त्याचे काम सुरु आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कडा येथे असलेला पुतळा रस्त्याच्या मध्यभागी घेण्यात यावा.याबाबत यापूर्वी देखील शासन, प्रशासनाकडे निवेदन दिलेले आहेत.सध्या कडा येथे रस्ता काम सुरु असुन होणा-या रस्त्याच्या मध्यभागी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात यावा.ही आम्हां समाज बांधवाची मागणी आहे.अनेक वर्षाची मागणी आहे. या मागणीचा सहानुभुतीपुर्वक विचार करून पुतळा चौकात लातुर,संभाजीनगर धर्तीवर मध्यभागी बसवण्याबाबत संबधीतांना योग्य ते आदेश व्हावेत.या उपोषणात डा.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांच्यासह ग्यानबा साळवे,दिनकर वाघमारे,बाळासाहेब घाटविसावे, शहाजी सावंत,शंकर निकाळजे, दीपक गरुड, संदीप जाधव,शेषराव घुगे,विठ्ठल ससाणे, रावसाहेब पिंपळे,सुभाष माळी,महादेव शिंदे,संतोष साखरे आदि कार्यकर्ते उपस्थित होते. आष्टी तहसिलसमोर खंडागळे यांचे उपोषण सुरु करताच तहसीलदार प्रमोद गायकवाड यांनी उपोषणकर्त्यांची भेट न घेता येथून पळ काढल्याने उपोषणकर्त्यांनी निष्क्रिय तहसिलदार हाय हाय.. च्या घोषणाबाजी करत तहसिल कार्यालय दणाणून सोडले. याबाबत अधिक माहिती अशी की,गेल्या वर्षभरापासून साबलखेड- आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे.सध्या हे काम कडा शहरात सुरू आहे. आष्टी येथील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात येत आहे.या महामार्गावर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील असलेला डॉ. आंबेडकरांचा पुतळा हा रस्त्याच्या मध्यभागी बसवावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे यशवंत खंडागळे यांनी आष्टी तहसील कार्यालयात शुक्रवार दि.२ रोजी सकाळी ११ वा.अमरण उपोषण सुरू केले होते सायंकाळी नायब तहसिदार मोरे यांच्या हस्ते लेखी आश्वासनाने खंडागळे यांनी उपोषण मागे घेतले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार दि.०४ ऑगस्ट २०२४ । पान ७

# पुण्यासह पिंपरी चिंचवडला पुराचा धोका? शहरालगतच्या तीन धरणांमधून पाण्याचा विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे अजित पवारांचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील खडकवासला, पवना, मुळशी, चासकमान धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत असून धरणे पूर्ण क्षमतेने भरल्याने या धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु करण्यात येत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरातील नद्यांच्या पूररेषेलगतच्या तसेच कोयना धरणातूनही मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु असल्याने कृष्णाकाठच्या गावातील, पुररेषेलगत व सखल भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याचे व त्यांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्त, संबधित जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत. नागरिकांनीही स्वत:च्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.



हवामान विभागाने पुढील काही तास धरण क्षेत्र आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दत्तवाडी, पाटील इस्टेट, येरवडा परिसर, शिवाजी नगर कोर्ट परिसर, कामगार पुतळा, हॅरीस ब्रीज, दापोडी, जुनी सांगवी, कासारवाडी, पिंपरी कॅम्प , रावेत, बालेवाडी गावठाण, ज्युपीटर हॉस्पिटल परिसर, कपिल मल्हार परिसर, बाणेर, बावधन, संगमवाडी, एकता नगर तसेच नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांनी सतर्क रहावे. विशेषत: मुळा-मुठा संगमाजवळील भागात नदीपात्रातील विसर्गाचे प्रमाण जास्त असणार आहे.

महानगरपालिकेतर्फे नदीकाठच्या नागरिकांना आवश्यक सूचना देण्यात येत आहेत. प्रशासनातर्फे नागरिकांना तात्पुरते स्थलांतरीत होण्याचे आवाहन करण्यात आल्यास त्यास प्रतिसाद द्यावा. नदीपात्राजवळ जाऊ नये किंवा त्या परिसरात वाहने पार्कींग करू नये. जिल्ह्यातील इतरही भागातील धरणे भरली असून विविध धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग होत आहे.

# मला टार्गेट करून एकटे पाडलं जातय : हर्षवर्धन पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

कोणत्याही निवडणुका आल्या की बरेच लोक आणि यंत्रणा जाणीवपूर्वक मला टार्गेट करण्याचा प्रयत्न करतात. तसेच एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला जातो. असा आरोप करत भाजप नेते माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाना साधला आहे. मागील वीस वर्षे आपण महाविकास आघाडीत होतो. त्यावेळेस देखील बरीच लोक मला टार्गेट करायचे. आता महायुतीत आहे तरी देखील मला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. निवडणूक आली की हर्षवर्धन पाटलाला 'टार्गेट' करायचे हे जे काही षडयंत्र आहे याबद्दल कार्यकर्त्यांच्या मनात प्रचंड नाराजी आहे. असे ही म्हणत पाटील यांनी भिगवण येथे प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना अप्रत्यक्ष अजित पवारांवर निशाणा साधला आहे.



आगामी विधानसभेच्या निवडणुकीत इंदापूरच्या जागेवरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्यातील राजकीय वैर नेहमीप्रमाणे उफाळून येतंय की काय असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. मागील वेळी आपण महाविकास आघाडीत होतो. त्यावेळी देखील आपण लोकसभेला प्रामाणिकपणे काम केले. झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीला ही आमचा त्यांचा एवढा संघर्ष असताना सुद्धा आम्ही त्यांचे प्रामाणिकपणे काम केले, असं असताना सुद्धा आता विधानसभेला हर्षवर्धन पाटलाला एकट पाडायचं त्याच्या कार्यकर्त्याला अडचणीत आणायचं अशा पद्धतीने बरीच लोक आमच्या विरोधात कटकारस्थान करत आहेत,असे आता सामान्य माणस ही बोलत आहेत आणि मला ते अनुभवायला मिळतंय असेही हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं आहे.

मध्यंतरी मला गावागावात फिरू देणार नाही अशा पद्धतीची वक्तव्य ही झाली होती. तशा पद्धतीची यंत्रणा वेगवेगळ्या मार्गातून आमच्या बाबतीत पुन्हा घडतेय की काय असा प्रश्न निर्माण होतोय. मी तर त्याच वेळेस एक पत्र ही दिलं होतं ट्रीटही केलं होतं पण तशा पद्धतीच्या घटना आता मला टार्गेट केलं जात असल्यामुळे पुन्हा घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही असंही पाटील यांनी म्हटले आहे.

# गुगलवर नंबर शोधणे पडले महागात; सायबर चोरट्यांनी केली 'अशी' फसवणूक




**पुणे । प्रतिनिधी**


डॉक्टरांची ऑनलाईन अपॉईंटमेंट घेण्यासाठी गुगलवर नंबर सर्च करणाऱ्याची सायबर चोरट्याने ९६ हजारांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी खराडी येथील ४८ वर्षीय व्यक्तीने चंदननगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. ही घटना २१ फेब्रुवारी २०२४ रोजी घडली आहे.

अपॉईंटमेंट घेण्यास गुगलवर नंबर सर्च केल्यानंतर गुगलवरील मोबाईलवर संपर्क केला. तेव्हा सायबर चोरट्याने डॉक्टर बोलत असल्याचे सांगून एक फॉर्म भरायला लावला. त्यानंतर ९६ हजार १०० रुपयांची फसवणूक केली. दुसऱ्या घटनेत वडिलांचा एलआयसी एजंट बोलत असल्याचे सांगून तरुणीची ४४ हजार ९९९ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी एनआयबीएम भागात राहणाऱ्या २८ वर्षीय तरुणीने कोंढवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# पुणे पूरग्रस्तांना लगेच मदत द्या, तात्पुरती संरक्षक मजबूत भिंत बांधा; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे प्रशासनाला निर्देश

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात नुकतीच आलेली पूर परिस्थिती वारंवार होऊ नये म्हणून तात्पुरता उपाय म्हणून खडकवासला, एकता नगर, सिंहगड येथे पूर संरक्षक मजबूत भिंत बांधणे सुरु करा. निळ्या पूर रेषेतील (ब्ल्यू लाईन) नागरिकांचे कायमस्वरूपी पूनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका , जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने एक आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने वर्षा येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी पुणे जिल्हाधिकारी यांना





निर्देश दिले.

एकता नगर, सिंहगड याठिकाणी निळ्या पूर रेषेत सुमारे ३ लाख घरे असून ती अनेक वर्षांपासून आहेत अशी माहिती पालिका आयुक्तांनी दिली. याठिकाणी एफएसआय मिळत नसल्याने विकासक पुनर्विकासासाठी पुढे येत नाहीत असे त्यांनी निर्दर्शनास आणले. मुख्यमंत्र्यांनी यावर याठिकाणी विशेष दर्जा देऊन पुनर्विकासाचे काम करावे तसेच तसा आराखडा तयार करावा असे निर्देश दिले.

जलसंपदा प्रधान सचिव दीपक कपूर यांनी खडकवासला धरणातून पाणी सोडताना पुरेशी सूचना सर्व संबंधित यंत्रणांना दिल्याची माहिती दिली तसेच पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी यावेळी पूर परिस्थितीत प्रशासनाने तत्परतेने केलेल्या मदत आणि बचाव कार्याविषयी सांगितले. धरण क्षेत्रात मोठा पाउस झाल्याचेही ते म्हणाले. भविष्यात या भागात पुराचा धोका होऊ नये म्हणून नदी सुधार प्रकल्पात पूर संरक्षकाचा विचार करण्यात येईल असेही ते म्हणाले.

वाहनांची नुकसानभरपाई तातडीने द्या पूर परिस्थितीत पुण्यातील वाहनांचे मोठे नुकसान झाले पण नियमांमुळे नुकसान भरपाई मिळत नाही असे यावेळी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी यावर पुणे पालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना विमा कंपन्यांशी एकत्रितपणे बोलून यावर मार्ग काढण्यास आणि तातडीने वाहनधारकांना नुकसान भरपाई मिळावी अशा सूचना केल्या.

# उदापूर येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**ओतूर । प्रतिनिधी**

उदापूर (ता. जुन्नर) येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७२९ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पाडल्याची माहिती सावतामाळी मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे आणि उपाध्यक्ष श्रीधर शिंदे यांनी दिली.

पुण्यतिथीनिमित्त पाच दिवस संत सावता महाराजांचे चरित्र वाचन हभप विष्णू महाराज अमूप यांनी केले. तसेच सावता महाराजांची संजीवनसमाधी असलेले अरण येथून सोमवार (ता. २९) पासून संत सावता माळी मंडळाकडून काढण्यात आलेल्या पायी दीपज्योतीचे शनिवारी (ता. ३) उदापूर येथे सकाळी आगमन झाले. गावात दीपज्योतीचे उत्साहात स्वगत करण्यात आले. ही दीपज्योत आणण्याचे १२ वे वर्ष आहे.

यावेळी पारंपरिक वाद्याच्या गजरात आणि बैलगाडीत संत सावता माळी महाराजांची प्रतिमा आणि दीपज्योतीची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांनी झांज पथक आणि झेंडा पथकासह सहभागी होऊन मिरवणुकीची शोभा वाढविली.

त्यानंतर हभप जालिंदर महाराज वाजे (मावळ) यांनी कीर्तनरूपी सेवेतून सावता महाराज यांच्या कार्याची महती विशद केली. यावेळी ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष बाजीराव कुलवडे, श्रीराम देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष पांडुरंग शिंदे, सरपंच सचिन आंबडेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तुळशीराम शिंदे, उपसरपंच जयश्री अमूप, महात्मा फुले पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंदे, तंटामुक्तीचे अध्यक्ष सुनील कुलवडे, राजेंद्र कुलवडे, मुरलीधर भास्कर, गणपत शिंदे, रोहिदास शिंदे, प्रमिला शिंदे, पूनम शिंदे, संजय अमूप, मोहन वल्हवनकर, देविदास शिंदे, बाजीराव शिंदे, अप्पा शिंदे, चंद्रकांत शिंदे, अशोक शिंदे, प्रदीप अमूप आणि पायी दीपज्योत आणणारे तरुण, ज्येष्ठ सहकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सावता माळी मंडळ, उदापूर आणि ग्रामस्थांनी केले.

# फार्मसी प्रवेश प्रक्रियेसाठी यंदा दिवाळी उजाडणार

**पुणे । प्रतिनिधी**

फार्मसी प्रवेशासाठी महाविद्यालयांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया अर्थात 'पीसीआय' कडून मान्यता घ्यावी लागते. त्यानंतर विद्यापीठांकडून संलग्नतेची प्रक्रिया करून मगच विद्यार्थ्यांना सीईटी सेलमार्फत फार्मसीच्या विविध अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात.



यंदा ऑगस्ट महिना सुरू झाला, तरी पीसीआयकडून महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली नाही. त्यामुळे फार्मसी प्रवेश प्रक्रियेसाठी यंदा दिवाळी उजाडणार असल्याची माहिती काही फार्मसी महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे बहुतांश सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. परंतु, बी. फार्मसी व फार्म. डी. अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे फार्मसी अभ्यासक्रम प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

पीसीआयने अद्याप महाविद्यालयांना मान्यता दिलेली नाही. परिणामी, विद्यापीठांना संबंधित महाविद्यालयांना संलग्नता देणे शक्य झालेले नाही. या सर्व गोंधळामुळे फार्मसी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया रखडली असून, प्रवेश प्रक्रियेसाठी दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागू शकतो, असा अंदाज उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी देखील व्यक्त केला आहे. कोरोना प्रादुर्भावानंतर फार्मसी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. बारावीनंतर फार्मसी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. परंतु, इंजिनिअरिंग, हॉटेल मॅनेजमेंट, एमबीए, विधी, एमसीए, ॲग्रिकल्चर, प्लॅनिंग अँड डिझायनिंग, बी. एड. सह काही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यातील काही अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या एक ते दोन फेऱ्या झाल्या आहेत. परंतु, फार्मसी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अद्याप देखील सुरू झालेली नाही. विद्यार्थी व पालक प्रवेश प्रक्रियेच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, त्यांना तंत्रशिक्षण विभाग किंवा सीईटी सेलकडून याबाबतचे उत्तर मिळत नाही. त्यामुळे गोंधळाची स्थिती आहे.

# सिंहगड हाफ मॅरेथॉन पावसामुळे २२ सप्टेंबरला

**पुणे । प्रतिनिधी**

'स्वानंद फाउंडेशन'तर्फे रविवारी (ता. ४) होणारी 'सिंहगड हाफ मॅरेथॉन' पावसामुळे पुढे ढकलली आहे. सिंहगड घाट रस्त्यावर झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनांमुळे ही मॅरेथॉन आता २२ सप्टेंबरला होणार असल्याची माहिती संस्थेचे साहिल शहा आणि विजय गायकवाड यांनी दिली.

डोणजे ते सिंहगड असा या मॅरेथॉनचा मार्ग असून याची सुरुवात आणि शेवट सिंहगडाच्या पायथ्याला असलेल्या कृष्णा वॉटर पार्कजवळ होणार होता. मात्र याच मार्गावर दरड कोसळण्याच्या दोन घटना घडल्या. सध्या पावसाचा जोर सुरू असल्याने अशा घटना घडू शकतात, त्यामुळे खबरदारी म्हणून हा निर्णय घेतला आहे.

फक्त तारखेत बदल असून मॅरेथॉनचे बाकी स्वरूप तेच असणार आहे. आता २२ सप्टेंबरला ही मॅरेथॉन पहाटे पाच वाजून ४५ मिनिटांनी सुरू होणार आहे. ती २१, १० आणि ५ किलोमीटर या प्रकारांत असल्याचे संजीव शहा यांनी सांगितले.

# शिवाजीराव भोसले बँक घोटाळ्याप्रकरणी माजी सरपंचाला उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीराव भोसले बँक घोटाळा प्रकरणातील सहआरोपी असलेला माजी सरपंच राहुल टाकळकर याला उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जमादार यांनी जामीन मंजूर केला. शिवाजीराव भोसले बँक करोडो रुपयाच्या गैरव्यवहार प्रकरणामध्ये माजी आमदार अनिल भोसले आणि मंगलदास बांदल आरोपी आहेत.



यात राहुल टाकळकर याला आर्थिक गुन्हे शाखेने तपास दरम्यान दि. १६ मार्च २०२२ रोजी अटक केली होती. आरोपी राहुल टाकळकर हे हिवरे कुंभार (तालुका शिरुर) येथील माजी सरपंच आहेत. आरोपी राहुल टाकळकरचा जामीन अर्ज पुण्याच्या विशेष सत्र न्यायालयाने नामंजूर केल्यानंतर आरोपीने ॲड. सुजय पळशीकर आणि ॲड. निलेश वाघमोडे यांच्यामार्फत जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालय येथे अर्ज केला.

आरोपीची बाजू ज्येष्ठ वकील राजीव चव्हाण आणि ॲड. सुजय पळशीकर, ॲड. निलेश वाघमोडे यांनी मांडली. आरोपी राहुल टाकळकर याचा आरोप केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराशी काही एक संबंध नाही. राहुल टाकळकर नावाने लोन काढून त्याचे व्यवहार हे बँकेचे चेअरमन अणि इतर लोकांच्या नावाने झाले व बँकमध्ये इतर नावाने फिरवले गेले आहेत, तसा ऑडिट रिपोर्ट आहे. राहुल टाकळकर याचा फक्त वापर केला गेला आहे. त्याच्या निव्वळ बँक अकाउंटमधून कॅश उचल केली आणि जमा केली म्हणून तो गुन्हा होत नाही. आरोपी हा मार्च २०२२ पासून कारागृहात आहे. तपास पूर्ण झाला आहे आणि आरोपी विरुद्ध चौथे पुरवणी दोषारोप पत्र दाखल केले आहे. तसेच संपूर्ण गुन्हा हा कागदोपत्री पुराव्यावर आधारित आणि खटला सुरू केव्हा होईल आणि संपेल याची शाश्वती नाही, अशा परिस्थिती आरोपीला कारागृहामध्ये ठेवणे कायद्याला अनुसरून नाही, हा बचाव पक्षाचा युक्तिवाद मान्य करत न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला.

# खामगाव येथील गाडीमोडीच्या भर चौकात युवकाचा खून

दौंड । प्रतिनिधी

खामगाव तालुका दौंड येथील वर्दळीच्या मुख्य गाडीमुळे चौकामध्ये सुरज भुजबळ या युवकाचा खून झाला आहे. सदर घटना शनिवार दिनांक ३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सुमारास घडली.

सुरज याचे गाडीमोडी चौकामध्ये कपड्याचे दुकान आहे. दुकानांमध्ये सुरज बसला असता मारेकऱ्यांनी अचानक दुकानांमध्ये प्रवेश केला. सोबतच्या कोयत्याच्या साह्याने त्याच्या मानेवरती वार केले. काही समजण्याच्या आतच सुरज धारातीर्थी पडला. सुरजने आरडाओरडा केल्यानंतर मारेकरी पळुन गेले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांमध्ये हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ चौकामध्ये जमा झाले. यवत पोलीसांना माहिती कळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी सुरजच्या आईने मारेकऱ्यांना हजर करा तरच मृतदेहाला हात लावा अशी भूमिका घेतली. काही वेळानंतर जमावाला पांगवुन पोलिसांनी परिस्थिती

# अण्णा भाऊ साठे जागतिक दर्जाचे साहित्यिक - वि. दा. पिंगळे

**पुणे । प्रतिनिधी**

अण्णा भाऊ साठे हे जागतिक दर्जाचे साहित्यिक होते, असे मसाप पुण्याचे ( झींपश ) कार्यवाह वि. दा. पिंगळे यांनी सांगितले. पुणे महानगरपालिका मराठी भाषा संवर्धन समिती पुरस्कृत साहित्यिक कट्टा वारजे आयोजित लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीच्या निमित्ताने आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्ताने वारजे या ठिकाणी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे एक पुरोगामी साहित्यिक या विषयावर सुप्रसिद्ध साहित्यिक आणि वक्ते, मसाप पुण्याचे कार्यवाह वि.दा .पिंगळे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

वि.दा .पिंगळे म्हणाले अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्याचा केंद्रबिंदू हलवला. पहिल्यांदा मराठी साहित्यामध्ये महानगरातील व्यथा वेदना आणि गाव कुसाबाहेर अस्पृश्य, दलित व उपेक्षित समाजाचे, व्यक्तींचे दुःख, वेदना आपल्या साहित्यातून प्रकट केले. अण्णा भाऊ साठेंचा लेखनाचा मूळ धर्म हा सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन हाच होता. समाजातील विषमता संपली पाहिजे. इथे प्रत्येक व्यक्तीला समानतेने जगता आले पाहिजे .अण्णा भाऊंच्या साहित्याला जीवन जाणिवांचा स्पर्श असल्यामुळे ते साहित्य सर्वसामान्य वाचकांना आपले वाटते .जे विषय प्रस्थापित साहित्यिकांनी कधीही आपले म्हणून स्वीकारले नाहीत अशा महत्त्वाच्या विषयांना अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून न्याय दिला.

मुंबईसारख्या शहरात झोपडपट्टीत राहणारे गरीब लोक ,फुटपाथवर झोपणारे लोक, वेश्या व्यवसायात अडकवल्या गेलेल्या मुली, मुरळीप्रथा असेल, तमाशा कलावंत असतील, गिरणी कामगार असतील या सर्वांच्या व्यथा त्यांनी प्रखडपणे आपल्या कथा कादंबऱ्यातून मांडण्याचे काम केले. अण्णा भाऊंनी एकूण ३५ कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यापैकी जवळपास १६ कादंबऱ्या ह्या स्त्रीप्रधान कादंबऱ्या आहेत. अण्णाभाऊंनी कथा ,कादंबऱ्या, लोकनाटच , लावण्या,पोवाडे ,प्रवास वर्णन अशी जवळपास ८४ पुस्तकांचे लेखन केले. त्यांच्या कादंबऱ्यातील आणि कथेतील नायिका ह्या आपले चारित्र्य व शील सांभाळण्यासाठी धाडसाने लढणाऱ्या आहेत.

अण्णाभाऊ नेहमी असं म्हणायचे वडील




किंवा पुरुष जर आकाश असेल तर आई किंवा स्त्री ही धरणी आहे आणि धरणीचे मोल मान्य केल्याशिवाय आकाशाला महत्त्व प्राप्त होणार नाही. स्त्रीचा सन्मान करायला हवा. अण्णा भाऊ हे सामाजिक तळमळ असलेले साहित्यिक होते. त्यांनी कधीही स्वतःचे लेखकपण मिरवण्यासाठी, पुरस्कारासाठी लेखन केले नाही, तर माझा लेखणीतून व माझ्या शाहिरीतून समाजाचे दैन्य आणि दु:ख कमी व्हावं , समाजातल्या विषमतेवर प्रखरपणे त्यांनी प्रहार केला. अवघे ४९ वर्षांचे आयुष्य अण्णाभाऊंना मिळाले पण आपले सर्व आयुष्य समाज परिवर्तन आणि प्रबोधनासाठी आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी त्यांनी खर्च केले .

साहित्य, चित्रपट व राजकीय क्षेत्रातील बड्या व्यक्तींशी त्यांचा स्नेह होता पण त्यांनी कधीही त्या व्यक्तींकडे स्वतःसाठी पद किंवा आर्थिक मागणी कधीच केली नाही. चिरागनगरच्या झोपडीत आयुष्यभर आपल्या प्रतिभेचा चिराग सांभाळत राहिले.कंदीलाच्या उजेडात समाजातला अंधार दूर व्हावा म्हणून शब्दांची ज्योत प्रज्वलित ठेवत राहिले. अण्णा भाऊ साठे हे जागतिक दर्जाचे साहित्यिक होते पण त्या काळामध्ये समीक्षकांनी त्यांच्या साहित्याची दखल घेतलीच ( झींपश ) नाही. अण्णाभाऊंचे साहित्य मानवतेचा संदेश देणारे होते, असे वि.दा .पिंगळे यांनी आपल्या भाषणातून विचार व्यक्त केलेत. कार्यक्रमाचे आयोजक माजी नगरसेवक प्रदीप उर्फ बाबासाहेब धुमाळ, पुणे महानगरपालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या सौ.दिपालीताई धुमाळ व कर्वेनगर भागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. के.डी पवार व इतरही मान्यवर उपस्थित होते. प्रदीप धुमाळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अतुल घटवाई यांनी केले. दिपाली धुमाळ यांनी वक्ते वि.दा. पिंगळे यांचा विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार केला. याप्रसंगी वि. दा. पिंगळे यांनी लोकमान्य टिळक यांचा कर्तुत्वाचा देखील आढावा घेतला. जयंत जतकर यांनी आभार मानले.